# प्रकरण २ रे: भारतातील पर्यटन केंद्रे

**२.१ भारतातील नैसर्गिक पर्यटन केंद्रे**
**२.२ भारतातील धार्मिक पर्यटन केंद्रे**
**२.3 भारतातील सांस्कृतिक पर्यटन केंद्रे**
**२.४ भारतातील ऐतिहासिक पर्यटन केंद्रे**

## २.१ भारतातील नैसर्गिक पर्यटन केंद्रे (Natural tourism centers in India)

भारतात नैसर्गिक पर्यटनस्थळाचा विकास भरपूर झालेला आहे कारण भारतामध्ये भौगोलिक घटकांमध्ये भरपूर विविधता आढळते.. भारतामध्ये हिरवेगार शांत वातावरण, स्वच्छ हवा, नैसर्गिक सृष्टीसौंदर्य असलेली अनेक पर्यटन स्थळे आहेत. या पर्यटन स्थळाकडे पर्यटक नेहमीच आकर्षित होतात. नैसर्गिक पर्यटन स्थळांमध्ये थंड हवेची ठिकाणे, समुद्रकिनाऱ्यावरील बीचेस, अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, सरोवरे, धबधबे इत्यादी पर्यटन स्थळाचा समावेश होतो. अशी पर्यटन स्थळे भारतात अनेक आहेत. भारतातील नैसर्गिक महत्त्वाची पर्यटन स्थळे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१.शिमला (हिमाचल प्रदेश)

२. कुल्लू मनाली (हिमाचल प्रदेश)

३.खज्जियार (हिमाचल प्रदेश)

४.दाल सरोवर (जम्मू-काश्मीर)

५. . काश्मीर खोरे (जम्मू-काश्मीर)

६.नैनिताल (उत्तरांचल)

७. जिम कार्बेट राष्ट्रीय उद्यान (उत्तरांचल)

८. व्हॅली ऑफ फ्लावर्स नॅशनल पार्क (उत्तराखंड)

९. दार्जीलिंग (पश्चिम बंगाल)

१०. सुंदरबन राष्ट्रीय उद्यान (पश्चिम बंगाल)

११ कान्हा राष्ट्रीय उद्यान (मध्य प्रदेश)

१२. सांभर सरोवर (राजस्थान)

१३.चिल्का सरोवर (ओरिसा)

१४.काझीरंगा अभयारण्य (आसाम)

१५. लोकटाक सरोवर (फ्लोटिंग लेक,मणिपूर)

१६.मरिना बीच (तामिळनाडू )

१७.कलंगुट बीच (गोवा)

१८.जोग धबधबा (कर्नाटक)

१९.दूध सागर धबधबा (गोवा)

२०.महाबळेश्वर (महाराष्ट्र)

२१. लोणार सरोवर (महाराष्ट्र)

२२. माथेरान (महाराष्ट्र)

**१.शिमला (हिमाचल प्रदेश)**

शिमला ही ब्रिटिशांची उन्हाळी राजधानी व हिमाचल प्रदेशाची सध्याची राजधानी आहे. हे ठिकाण चंदीगड पासून 120 किलोमीटर अंतरावर आहे. शिमला हे भारतातीलच नव्हे तर जगातील महत्त्वाचे थंड हवेचे ठिकाण समजले जाते. या थंड हवेच्या ठिकाणाची उंची समुद्रसपाटीपासून 2276 मिटर आहे. कालका - सिमला हा रेल्वे मार्ग 103 बोगद्यातून व 806 पुलावरून गेलेला आहे. या रेल्वेमार्गाने निसर्गाचा अनुभव घेत सिमल्याला पोहोचतात. उतरत्या छपराची बंगले, प्रशस्त बागा, पाईन वृक्ष हे शिमल्याची वैशिष्ट्य आहेत. उन्हाळ्यात गोल्फ तर हिवाळ्यात स्केटिंग हे खेळ मोठ्या प्रमाणात शिमल्यात चालतात. एप्रिल ते ऑक्टोबर हा काळ येथे पर्यटनास उत्तम असतो.

मॉल हा शिमल्याचा महत्त्वाचा सुंदर विभाग असून येथे ब्रिटीश काळातील सुंदर बंगले आहेत व एक शिमल्यातील मार्केटिंग सेंटर मॉल येथे आहे. जाखू हिल्स, समर हिल्स, चांद बिग, फॉल्स, तारा देवी मंदिर, संकटमोचन मंदिर, हनुमान मंदिर ही येथील प्रेक्षणीय ठिकाणे आहेत. हे थंड हवेचे ठिकाण असल्यामुळे भारतातून व जगातून हजारो पर्यटक या ठिकाणी भेटी देतात.

**२. कुल्लू मनाली (हिमाचल प्रदेश)**

कुलु हे शिमल्या पासून 250 किलोमीटर अंतरावर आहे. भारतात सफरचंदा साठी हे ठिकाण प्रसिद्ध असून याला देव खोरे असेही म्हणतात कारण येथील प्रत्येक गावात एक तरी मंदिर आहे. तेथील

देवतांची यात्रा दसऱ्याला असते हे खोरे सुंदर असून येथील रघुनाथाची मंदिर एका अरुंद घळीत आहे. येथून बियास नदी वाहते. हे पर्यटन स्थळ समुद्रसपाटीपासून 1279 मीटर उंचीवर आहे. येथे हजारो पर्यटक भेटी देतात.

मनाली हे हिमाचल प्रदेशातील कुलु जिल्ह्यातील एक थंड हवेचे ठिकाण आहे. याची समुद्रसपाटीपासून उंची 2050 मीटर आहे. मनाली हे सिडारच्या गर्द जंगलांनी आच्छादलेले हिमशिखराने वेढलेले आणि बिआस नदीच्या धीरगंभीर आवाजाने भारावलेले एक पर्यटन स्थळ आहे. मनाली येथे बर्फावरील घसरगुंडी याचा मनमुराद आनंद पर्यटक घेतात. मनाली येथे सफरचंदाच्या बागा भरपूर आहेत येथील बर्फाळ प्रदेश, निसर्गरम्य वातावरण, यामुळे कुलू आणि मनाली या ठिकाणी पर्यटकांची गर्दी असते.

**३.खज्जियार (हिमाचल प्रदेश)**

खज्जियार हे हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्ह्यातील एक थंड हवेचे ठिकाण आहे. या ठिकाणापासून 24 किलोमीटर अंतरावर डलहौसी हे ठिकाण आहे. हे थंड हवेचे ठिकाण समुद्रसपाटीपासून 2000 मीटर उंचीवर आहे ज्याला आज **मिनी स्विझर्लांड ऑफ इंडिया** असे म्हटले जाते. या थंड हवेच्या ठिकाणी हिरवेगार कुरण,पाईन्स व देवदार वृक्ष जंगलाने वेढलेले आहे. त्यामुळे याठिकाणी वर्षभरामध्ये हजारो पर्यटक भेटी देतात. खज्जियार सरोवर व कला टॉप खज्जियार अभयारण्य येथील प्रसिद्ध ठिकाण आहेत.

**४.दाल सरोवर (जम्मू-काश्मीर)**

दाल सरोवर श्रीनगर जवळ आहे.जम्मू-काश्मीरमधील दुसरे सर्वात मोठे सरोवर आहे. हे सरोवर 18 किलोमीटर मध्ये पसरलेले आहे. या सरोवराच्या तिन्ही बाजूला पर्वत आहे. भारतातील सुंदर सरोवरामध्ये दाल सरोवराची गणना केली जाते. भारतातील पर्यटक जम्मू-काश्मीरमधील दाल सरोवर बघितल्याशिवाय जाऊ शकत नाहीत.

**५. काश्मीर खोरे (काश्मीर)**

काश्मीर खोरे हे देशी-परदेशी पर्यटकांचे एक लोकप्रिय पर्यटनस्थळ आहे. घाटीतील लोकप्रिय पर्यटन स्थळांपैकी गुलमर्ग येथे स्की रिसॉर्ट आहे, डल लेक ज्यामध्ये लोकप्रिय घरांच्या बोटी आहेत, पहलगाम आणि प्रमुख हिंदू मंदिर अमरनाथ मंदिर आहे.

हे खोरे दक्षिणेकडे पीर पंजाल रेंजने आणि ईशान्य दिशेला मुख्य हिमालय पर्वतमाला वेढलेली आहे. हे अंदाजे 135 किमी लांब आणि 32 किमी रूंद आहे, येथून झेलम नदी वाहते.

**६.नैनिताल (उत्तरांचल)**

हे थंड हवेचे ठिकाण उत्तरांचल राज्यातील नैनिताल जिल्ह्याचे ठिकाण आहे. नैनिताल हे हिमालय पर्वताच्या कुमाऊ पर्वतरांगेतील भारतातील पर्यटकांचे आकर्षक असे ठिकाण आहे.नगराच्या मध्यभागी डोळ्याच्या आकाराचे सरोवर आहे त्यामुळे या सरोवराला नैनी असे म्हणतात. हे शहर सरोवराच्या सभोवताली वसलेले असल्यामुळे या शहराला नैनिताल असे म्हणतात. या तलावाभोवती हॉटेल्स, भोजनालय व करमणूक केंद्राची गर्दी आहे. येथे अवकाश वेधशाळा हे पर्यटकांचे आकर्षण आहे. या पर्यटन स्थळाची समुद्रसपाटीपासून 2084 मीटर आहे. या पर्यटन स्थळी उत्तुंग पर्वत शिखरे, खोल दऱ्या, उंच वृक्षांची घनदाट जंगले, नागमोडी वाहणाऱ्या नद्या, सरोवरे यामुळे हे पर्यटन स्थळ पर्यटकांचे आकर्षण ठरले आहे.

**७. जिम कार्बेट राष्ट्रीय उद्यान (उत्तरांचल)**

उत्तरांचल राज्यातील वाघासाठी प्रसिद्ध असणारे पर्यटन स्थळ आहे. हे राष्ट्रीय उद्यान भारतातील पहिले उद्यान आहे. नरभक्षक वाघाची शिकार करणाऱ्या जिम कार्बेट या जगप्रसिद्ध शिकारीचे नाव या राष्ट्रीय उद्यानाला दिले आहे. नैनिताल पासून 120 किलोमीटर अंतरावरील हे उद्यान वाघा साठी प्रसिद्ध आहे. वाघाशिवाय हत्ती, चितळ, हरीण, चित्ते, अस्वल, मोर आणि विविध पक्षी आढळतात. यामुळे हा भाग पर्यटकांचे आकर्षण ठरला आहे. डिसेंबर ते एप्रिल या कालावधीत वन्यप्राणी पाहण्यासाठी चांगला काळ समजला जातो येथे या नैसर्गिक पर्यटन ठिकाणी हजारो पर्यटक भेटी देतात.

**८. व्हॅली ऑफ फ्लावर्स नॅशनल पार्क (उत्तराखंड)**

व्हॅली ऑफ फ्लावर्स नॅशनल पार्क हे राष्ट्रीय उद्यान उत्तराखंड राज्यातील उत्तर चामोली येथे आहे. स्थानिक अल्पाइन फुलांचे कुरण आणि वनस्पतींच्या विविधतेसाठी ओळखले जातो. हे वैविध्यपूर्ण क्षेत्र एशियाई ब्लॅक अस्वल, हिम बिबट्या, कस्तुरी हिरण, तपकिरी अस्वल, लाल कोल्ह, आणि निळया मेंढींसह दुर्मिळ आणि संकटात सापडलेल्या प्राण्यांचे घर आहे. उद्यानात आढळलेल्या पक्ष्यांमध्ये हिमालयीय मोनल तीतर आणि इतर पक्ष्यांचा समावेश आहे.हे हिमालयात असलेल्या नंदा देवी बायोफिअर रिझर्वचा एक भाग आहे.

**९. दार्जीलिंग (पश्चिम बंगाल)**

दार्जिलिंग हे पश्चिम बंगाल राज्यातील एक शहर आहे. हे शहर दार्जिलिंग जिल्ह्याचे मुख्यालय आहे. हे शहर शिवालिक पर्वताच्या लहान हिमालयात आहे. येथे सरासरी उंची 2,138 मीटर (6,962 फूट) आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर दार्जिलिंग चहासाठी प्रसिद्ध आहे.

**१०. सुंदरबन राष्ट्रीय उद्यान (पश्चिम बंगाल)**

सुंदरबन राष्ट्रीय उद्यान हे भारतातील प्रमुख राष्ट्रीय उद्यान आहे. हे उद्यान भारताच्या पश्चिम बंगाल राज्यातील दक्षिण २४ परगणा या जिल्ह्यात असून बांगलादेशाच्या सीमेलगत आहे. जगातील सर्वाधिक वाघांची संख्या या उद्यानात आढळते. अत्यंत वैविध्यपूर्ण निसर्गामुळे तसेच मोठ्या प्रमाणावर आढळणारे वन्यप्राणी व पक्षी यांमुळे सुंदरबनची जागतिक वारसा स्थान म्हणून निवड झाली आहे.

हे जंगल मुख्यत्वे खारफुटीचे जंगल आहे. खारफुटीला इंग्रजीत मॅंग्रोव्ह म्हणतात. सुंदरबन हे जगातील सर्वात मोठे खारफुटीचे जंगल आहे. सुंदरबनमध्ये ६४ प्रकारच्या वनस्पती आढळतात. जगातील खारफुटीच्या ५० टक्यांपेक्षाही अधिक वनस्पतीच्या प्रजाती येथे आहेत. सुंदरी नावाची वनस्पती मोठ्या प्रमाणावर आढळते त्यामुळेच सुंदरबन नाव पडले आहे. इतर वनस्पतीमध्ये गेनवा, धुंदाल, पासुर, गर्जन, गोरान या प्रमुख वनस्पती आहेत.

**११. कान्हा राष्ट्रीय उद्यान (मध्य प्रदेश)**

कान्हा राष्ट्रीय उद्यान हे व्याघ्रप्रकल्प राबविला गेलेले भारतातील मध्य प्रदेशातील एक महत्त्वाचे राष्ट्रीय उद्यान आहे. भारतात व्याघ्रप्रकल्प सर्वाधिक यशस्वी येथे ठरला, अशी या उद्यानाची ख्याती आहे. सुप्रसिद्ध नोबेल पारितोषिक विजेते लेखक रुडयार्ड किपलिंग यांची प्रसिद्ध जंगल बुक ही साहित्यकृती याच उद्यानावरून सुचली. हे जंगल १८७९ साली संरक्षित उद्यान म्हणून घोषित करण्यात आले आणि त्याची राष्ट्रीय उद्यान म्हणून स्थापना १ जून १९५५ रोजी झाली . त्याअगोदर हे राष्ट्रीय उद्यान हलून आणि बंजर या दोन अभयारण्यांमध्ये विभाजित होते. आजचे राष्ट्रीय उद्यान हे मंडला व बालाघाट या मध्यप्रदेशातील दोन जिल्ह्यांमध्ये पसरले आहे. उद्यानाचे गाभा क्षेत्र व परिसर क्षेत्र मिळून एकूण १००९ चौ.किमी इतके क्षेत्र आहे. या उद्यानाचे सर्वात मोठे आकर्षण वाघ आहे. येथे वाघ दाखवण्याच्या अनेक सफरी आयोजित केल्या जातात व वाघांची संख्या जास्त असल्याने बहुतांशी हमखास वाघ दिसतो. वाघाबरोबरच येथील इतर वन्यप्राण्यांची लक्षणीय संख्या हे येथील वैशिष्ट्य आहे. इतर वन्यप्राण्यांमध्ये अस्वल , बाराशिंगा हरीण, भारतीय रानकुत्री ढोल

अथवा [[कोळसून |भारतीय रानकुत्री]], बिबट्या, चितळ, सांबर इत्यादी आहे. चितळांचेही सर्वाधिक प्रमाण येथे आढळून येते.

**१२. सांभर सरोवर (राजस्थान)**

भारतातील सर्वांत मोठे खाऱ्या पाण्याचे सरोवर. राजस्थान राज्याच्या पूर्वमध्य भागातील नागौर व जयपूर जिल्ह्यांत त्याचा विस्तार असून अजमेर जिल्ह्याची सरहद्द सरोवराला येऊन भिडली आहे. या सरोवराच्या पूर्वेला रेल्वे लाईन आहे. त्या रेल्वे लाईनलवर सांबरलेक सिटी आणि जयपूर विमानतळ ही दोन स्टेशन्स आहेत. जगात सरोवरांना दर्जा देण्यासाठी जी रामसर साइट संकल्पना आहे तो दर्जा या सरोवराला देण्यात आला आहे. या सरोवराच्या पाणथळ भागात दरवर्षी सैबेरिया आणि उत्तर आशिया या भागातून हिवाळ्यात हजारोंच्या संख्येने फ्लेमिंगो पक्षी येत असतात. सरोवराच्या लगतच्या जंगलात नीलगाई, हरणे व कोल्हे यांचा मुक्त संचार असतो.

**१३.चिल्का सरोवर (ओरिसा)**

चिल्का सरोवर हे एक खाऱ्या पाण्याचे ओरिसा राज्यातील उथळ, सर्वांत मोठे आणि प्रसिद्ध सरोवर, हे कलकत्ता-मद्रास लोहमार्गावर भुवनेश्वरपासून सु. ८९ किमी. वर आहे. दया नदीच्या मुखाशी समुद्रकिनाऱ्याला लागूनच पुरी, खुर्दा आणि गंजम अशा तीन जिल्ह्यात याचा विस्तार आहे. भारतातील हे पहिल्या क्रमांकाचे आणि जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे असे समुद्रकिनारी सरोवर आहे. नयनरम्य असे सरोवर, अतिशय निसर्गरम्य अशी सृष्टी, शांत, आल्हाददायक वातावरण, पक्षीनिरीक्षणासाठी भरपूर संधि, यामुळे पर्यटनासाठी सुरेख ठिकाण आहे.

**१४.काझीरंगा अभयारण्य (आसाम)**

काझीरंगा राष्ट्रीय उद्यान हे आसाम राज्यातील गोलाघाट व नागांव जिल्ह्यातील राष्ट्रीय उद्यान आहे. याचा समावेश जागतिक वारसा स्थानांत केलेला असून, जगात सापडणाऱ्या भारतीय एकशिंगी गेंड्यांपैकी दोन-तृतीयांश गेंडे या अभयारण्यात सापडतात.काझीरंगामध्ये अनेक वाघ असून २००६ मध्ये त्याला वाघांचे अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले. या जंगलात अनेक हत्ती, पाणम्हशी तसेच हरणे आढळतात. काझीरंगा अभयारण्यामध्ये अनेक दुर्मिळ पक्षी आढळतात. काझीरंगा हे भारतातील सर्वात जास्त सुरक्षित अभयारण्य मानले जाते.काझीरंगामध्ये चार प्रमुख नद्या आहेत. यापैकी मुख्य म्हणजे ब्रह्मपुत्रा नदी होय. तसेच

अनेक छोटे-मोठे पाण्याचे तलावसुद्धा आढळतात. काझीरंगाला १९०५ मध्ये संरक्षित वनक्षेत्राचा दर्जा मिळाला होता.

**१५. लोकटाक सरोवर (फ्लोटिंग लेक,मणिपूर)**

लोकटाक हे मणिपूर राज्यातील एक गोड्या पाण्याचे सरोवर आहे. मणिपूरच्या दक्षिण भागात इम्फालच्या ४० किमी दक्षिणेस स्थित असलेले हे सरोवर भारतामधील सर्वात मोठे गोड्या पाण्याचे सरोवर आहे. ह्या सरोवराचे वैशिठ्य म्हणजे येथील तरंगती बेटे. अशाच एका ४० चौरस किमी क्षेत्रफळ असलेल्या मोठ्या तरंगत्या बेटावर असलेले येथील कैबुल लामजो राष्ट्रीय उद्यान हे जगातील एकमेव तरंगते राष्ट्रीय उद्यान आहे. संगई नावाचे दुर्मिळ हरीण केवळ येथेच सापडते. येथे जगभरातील हजारो पर्यटक भेट देतात

**१६.मरिना बीच (तामिळनाडू )**

चेन्नईचा मरीना बीच हा देशातील सर्वाधिक लांबीचा नैसर्गिक समुद्रकिनारा आहे. तर जगभरातील सर्वाधिक लांबीच्या शहरी समुद्रकिनाऱ्यांमध्ये याचा पहिला नंबर आहे. बंगालच्या उपसागरालगतचा हा मरीना किनारा चेन्नईच्या उत्तरेकडे सेंट जॉर्ज किल्ल्यापासून ते दक्षिणेकडे बेसंट नगरपर्यंत तब्बल १३ किमी लांब पसरला आहे. मरीना बीच हा देशातील सर्वाधिक गर्दीचा समुद्रकिनारा असून शनिवार- रविवारी इथे दररोज तब्बल ५० हजार पर्यटक भेट देतात.

**१७.कलंगुट बीच (गोवा)**

कलंगुट बीच हा गोव्यातील सर्वात लोकप्रिय समुद्रकिनारा आहे आणि तो कलंगुट शहरात आहे. उत्तर गोव्यातील हा सर्वात मोठा समुद्रकिनारा देखील आहे. विशेषत: नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यात जगभरातील हजारो पर्यटक भेट देतात. येथे विविध प्रकारचे उपक्रम पाहिले जातात. हा समुद्र किनारा गोव्याची राजधानी पणजीपासून अवघ्या 15 कि.मी. अंतरावर आहे. कलंगुट बीच हा उत्तर गोव्यातला सर्वात लांब बीच आहे आणि कॅन्डोलिम ते बागापर्यंतचा विस्तार आहे. कलंगुट बीच हे गोव्यातील सर्वात व्यस्त आणि व्यावसायिक समुद्रकिनाराचे नाव आहे. हा बीच पाण्याचे खेळ, पॅरासेलिंग, वॉटर सर्फिंग, केळीच्या सवारी आणि जेट स्कीइंग यासाठीही प्रसिद्ध आहे.

**१८.जोग धबधबा (कर्नाटक)**

जोग धबधबा हा भारताच्या कर्नाटक राज्यामधील एक धबधबा आहे. हा धबधबा शिमोगा जिल्ह्यात शरावती नदीवर असून तो दक्षिण आशियातील सर्वात उंच नैसर्गिक धबधबा आहेभारतातला उंचीमध्ये दुसऱ्या क्रमांकाचा हा जोगचा धबधबा. 253 मीटर उंचीचा अन 290 मीटर रुंदीचा हा धबधबा पहायला जगभरातून पर्यटक येथे येतात. (मेघालयातील नोह्कालीकाई 335 मीटर उंचीने पहिल्या क्रमांकावर). खरे पाहता शरावती नदी इतर वेळी पायथ्याशी येताना अनेक छोट्या छोट्या धबधब्याच्या स्वरूपात येत असते. परंतु ऐन पावसाळ्यात मात्र हे सर्व एकत्र येवून एकच मोठा धबधबा बनतो. जगातील 11व्या क्रमांकाचा धबधबा म्हणून याची नोंद आहे. "गिरसप्पा" व "जोगडा गुंडी" या नावाने देखील याची ओळख आहे

**१९.दूध सागर धबधबा (गोवा)**

दूधसागर धबधबा गोवा राज्यातील मांडोवी नदीवरील धबधबा आहे. हा धबधबा पणजीपासून ६० किमी अंतरावर आहे. हा धबधबा मडगाव-बेळगाव लोहमार्गावर असून मडगावच्या पूर्वेला ४६ किमी आणि बेळगावच्या दक्षिणेला ८० किमी अंतरावर आहे. दूधसागर धबधबा भारतातील सर्वात उंच धबधब्यांपैकी एक असून त्याची उंची ३१० मी (१०१७ फूट) आणि सरासरी रुंदी ३० मी आहे.

हा धबधबा पश्चिम घाटातील भगवान महावीर अभयारण्य आणि मोल्लेम राष्ट्रीय उद्यानामध्ये आहे. हा भाग जैवविविधतेने संपन्न असलेल्या घनदाट जंगलांनी वेढलेला आहे. उन्हाळयामध्ये हा धबधबा अतिशय नेत्रदीपक नसला, तरी पावसाळ्यामध्ये विशेषतः ऑगस्ट मध्ये याचे दृष्य विलोभनीय असते. दुधसागर धबधबा बराच प्रसिध्द असल्याने येथे दरवर्षी ८ ते १० हजार स्थानिक तसेच विदेशी पर्यटक भेट देत असतात. हा धबधबा अभयारण्यात असल्याने तेथे जाण्यासाठी वन खात्याची परवानगी घ्यावी लागते.

**२०.महाबळेश्वर (महाराष्ट्र)**

महाबळेश्वर हे ठिकाण महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्यातील एक थंड हवेचे ठिकाण व प्रेक्षणीय स्थळ असून, येथे पर्यटक वर्षभर भेट देतात. ब्रिटिश काळापासून महाबळेश्वराला लाभलेला उत्कृष्ट गिरीस्थान हा लौकिक आजही कायम आहे. समुद्रसपाटीपासून १,३७२ मीटर उंचीवर पश्चिम घाटांच्या रांगेत वसलेले महाबळेश्वर हे थंड हवेचे व सहलीचे निसर्गरम्य ठिकाण आहे. महाराष्ट्राचे नंदनवन म्हणून ओळखले जाणारे ठिकाण आहे. ब्रिटीशांनी या ठिकाणाला मुंबई प्रांताची उन्हाळयातील राजधानी म्हणून विकसीत केले

होते. चेरापुंजी नंतर भारतात सर्वाधिक पाऊस पडणारे हे दुस-या क्रमांकाचे ठिकाण आहे. येथील सर्वात जुने ठिकाण म्हणजे क्षेत्र महाबळेश्वर. या मंदिरात कृष्णा, कोयना, सावित्री, गायत्री आणि वेण्णा या पाच नद्यांचा उगम होतो. स्ट्रॉबेरी, रासबेरी, मलबेरी ही महाराष्ट्रात इतर कुठेही न आढळणारी फळे आपल्याला महाबळेश्वरला मिळतात.

महाबळेश्वर पाहताना बॉम्बे पॉइंट, ऑर्थर सीट, केटस् पॉईंट, लॉडविक - विल्सन, एलफिस्टन पॉईंट्स, वेण्णा लेक, लिंगमळा धबधबा, तापोळा, जवळचे श्रीक्षेत्र महाबळेश्वर, येथील महादेवाचे मंदिर ही ठिकाणे महत्त्वाची आहेत

**२१. लोणार सरोवर (महाराष्ट्र)**

लोणारचे सरोवर महाराष्ट्र राज्यामधील बुलढाणा जिल्ह्यातले **खाऱ्या पाण्याचे सरोवर** आहे. याची निर्मिती एका उल्कापातामुळे झाली.हे सरोवर औरंगाबाद शहरापासून १५० कि.मी. अंतरावर आहे. लोणार हे बेसॉल्ट खडकातील एकमेव मोठे आघाती विवर आहे. याचे पाणी अल्कधर्मी आहे. लोणार सरोवराच्या जतनासाठी व संवर्धनासाठी लोणार विवर हे वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित केले आहे.

**२२. माथेरान (महाराष्ट्र)**

महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्याच्या कर्जत तालुक्यातील प्रसिद्ध एक थंड हवेचे ठिकाण व प्रेक्षणीय स्थळ असून, येथे पर्यटक वर्षभर भेट देतात. या प्रदेशाच्या माथ्यावरील दाट वनश्रीमुळे याला 'माथेरान' हे नाव पडले असे म्हणतात. माथेरान वेगवेगळया टोकांवरून हिरवीगार वनश्री व परिसर यांचे विहंगम दृश्य दिसते. आरोग्यदायक व उत्साहवर्धक हवामान, मोहक सृष्टिसौंदर्य व मुंबईचे सान्निध्य यांमुळे या थंड हवेच्या ठिकाणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पर्यटकांसाठी हॉटेले, निवासगृहे, उपहारगृहे व भोजनालये, बाजार, उद्याने इ. सोयी उपलब्ध आहेत. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे येथे एक विश्रामगृह आहे. गावात रुग्णालय, दवाखाने, शाळा यांसारख्या नागरी सुविधाही आहेत. पर्यटकांचा हंगाम जवळजवळ वर्षभर, विशेषतः ऑक्टोबर-नोव्हेंबर आणि एप्रिल ते जून, असतो. येथे प्रवासाकरीता एक टॉय ट्रेन सुद्धा उपलब्ध आहे.

## २.२ भारतातील धार्मिक पर्यटन केंद्रे (Religious tourism centers in India)

भारताला धार्मिक वारसा लाभलेला आहे. भारताच्या पर्यटन विकासात इतर घटकापेक्षा धार्मिक घटकांना विशेष महत्त्व आहे यामध्ये मंदिरे ,समाध्या, दर्गे, गुरुद्वारे, चर्चेस यांना जास्त महत्त्व आहे. भारत हा अनेक धर्माचा देश आहे. भारतात ख्रिश्चन, मुस्लिम, ज्यू आणि हिंदू धर्माची अनेक पवित्र धार्मिक पर्यटन स्थळे आहेत त्यातील काही महत्त्वाची धार्मिक पर्यटन स्थळे पुढीलप्रमाणे.

१.वैष्णवी देवी मंदिर (जम्मू आणि काश्मीर)

२.अमरनाथ (जम्मू आणि काश्मीर)

३. सुवर्ण मंदिर (अमृतसर)

४. सबरीमाला मंदिर (केरळ)

५. तिरुपती मंदिर (आंध्र प्रदेश)

६. हरिद्वार (उत्तराखंड)

७. केदारनाथ (उत्तराखंड)

८. बद्रीनाथ (उत्तराखंड)

९. सारनाथ (उत्तर प्रदेश)

१०. काशी विश्वनाथ मंदिर, वाराणसी (उत्तर प्रदेश)

११. मथुरा (उत्तर प्रदेश)

१२. आयोध्या (उत्तर प्रदेश)

१३. बुद्धगया (बिहार)

१४. शिर्डी (महाराष्ट्र)

१५. विठ्ठल मंदिर,पंढरपुर (महाराष्ट्र)

१६. गोकर्ण (कर्नाटक)

१७. श्रवणबेळगोळ (कर्नाटक)

१८. मीनाक्षी मंदिर, मदुराई (तामिळनाडू)

१९. महाकालेश्वर मंदिर, उज्जैन (मध्य प्रदेश)

२0. सूर्य मंदिर, कोणार्क (ओरिसा)

२१. जगन्नाथ मंदिर, पुरी (ओरिसा)

**१.वैष्णवी देवी मंदिर (जम्मू आणि काश्मीर)**

वैष्णवी देवी हे धार्मिक पर्यटन स्थळ जम्मू आणि काश्मीरच्या केंद्र शासित प्रदेशातील कटरा जिल्ह्यांमध्ये आहे एक हिंदू मंदिर आहे. वैष्णो देवी, ज्याला माता राणी, त्रिकुटा आणि वैष्णवी म्हणून ओळखले जाते, ही माता आदिशक्ती हिंदू देवीचे प्रकटीकरण आहे. हे प्रसिद्ध मंदिर जगभरातील कोट्यावधी भाविकांना आकर्षित करते.

**२.अमरनाथ (जम्मू आणि काश्मीर)**

जम्मू आणि काश्मिर या केंद्रशासित प्रदेशातील अनंतनाग जिल्ह्यातील अमरनाथ हे एक धार्मिक पर्यटन स्थळ आहे. अमरनाथ हे हिंदूंचे एक प्रमुख तीर्थक्षेत्र आहे. अमरनाथ लेणी भगवान शिवातील प्रमुख मंदिरांपैकी एक आहे. अमरनाथ यांना तीर्थक्षेत्र म्हटले जाते कारण येथेच भगवान शिवने माता पार्वतीला अमरत्वचे रहस्य सांगितले. या पवित्र गुहेत बर्फासह नैसर्गिक शिवलिंग तयार होते हे या ठिकाणचे मुख्य वैशिष्ट्य आहे. नैसर्गिक बर्फापासून निर्माण झाल्यामुळे त्याला स्वयंभू हिमानी शिवलिंग असेही म्हणतात. संपूर्ण श्रावण महिन्यात आषाढ पौर्णिमेपासून रक्षाबंधन पर्यंत सुरू असलेल्या पवित्र हिमालिंग दर्शनासाठी लाखो लोक येथे येतात. गणेश, भैरव आणि पार्वती मूळ अमरनाथ शिवलिंगपासून कित्येक फूट अंतरावर एकसारखेच आईसबर्ग आहेत.

**३. सुवर्ण मंदिर (अमृतसर)**

पंजाब राज्यातील अमृतसर जिल्ह्यातील एक धार्मिक पर्यटन स्थळ आहे. येथे शीख धर्मीय लोक या पर्यटनस्थळांना भेटी देतात. पंजाब राज्यातील शिखांचे उपासनामंदिर, गुरुद्वारा आणि एक प्रसिद्ध पर्यटनस्थळ. ते अमृतसर शहरात एका भव्य तलावाच्या मध्यभागी वसले आहे. हरमंदिर साहेब, दरबार साहेब, हरिमंदिर इ. नावांनीही त्याचा उल्लेख होतो. शिखांचा पवित्र ग्रंथ गुरु ग्रंथसाहिब पहिल्यांदा या मंदिरात ठेवला गेला. त्यामुळे या मंदिराला शीख धर्मपीठाचे महत्त्व प्राप्त झाले. शिखांचे चवथे गुरु रामदास यांनी त्याचा पाया घालून तेथेच एक नगर वसविले. पुढे शिखांचे पाचवे गुरु ⇨ अर्जुनदेव यांनी १५८८–१६०७ दरम्यान त्याचे बांधकाम पूर्ण केले. त्याचा अभिकल्प अर्जुनदेव यांनी शीख धर्मातील प्रतीके व संकल्पना यांनी परिपूर्ण बनविला. त्याची वास्तू चौरस असून सांडवा किंवा साकवावरुन मंदिरात प्रवेश करावा लागतो. मूळ वास्तू दुमजली व त्यावर घुमट असावा. तिचे मातीच्या विटेचे बांधकाम सुबक होते. मंदिराच्या उभारणीत भव्यतेपेक्षा साधेपणावर विशेष भर दिला आहे.

मंदिराला चारही बाजूंनी प्रवेशद्वारे असून सर्व जाति-धर्मांच्या स्त्री-पुरुषांना ते खुले आहे. येथील तलावाला ‘अमृत सरोवर’ आणि त्या भोवतीच्या शहराला ⇨ अमृतसर म्हणतात. अमृतसर अर्जुनदेवांनी वसविले. अहमदशहा अब्दाली याने या मंदिरावर विध्वंसक हल्ला केला (१७६२). पुढे शिखांच्या बाराव्या मिस्लने मंदिराची झालेली पडझड दूर करुन पुनर्बांधणी केली (१७६५). महाराजा रणजितसिंग (कार.१८०१–१८३९) यांनी मंदिराच्या मूळ ढाच्याला धक्का न लावता त्याची पुनर्बांधणी संगमरवर दगडात केली व कळस तांब्याच्या पत्र्याने मढवून त्याला सोन्याचा मुलामा चढविला. तेव्हापासून ते सुवर्णमंदिर म्हणून ख्यातनाम आहे. गुरुद्वारा व्यवस्थापन अधिनियमानुसार शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक कमिटी या लोकनियुक्त मध्यवर्ती मंडळाद्वारे त्याचे व्यवस्थापन चालते. शिखांच्या संदर्भातील सर्व निर्णय घेणारे ‘अकाल तख्त’ हरिगोविंद यांनी मंदिरासमोर बांधले आहे (१६०६). मंदिराच्या परिसरात अनेक लहान मंदिरे असून त्यांत शिखांच्या ऐतिहासिक शौर्यगाथा दर्शविणाऱ्या धातूंच्या तबकड्या लावल्या आहेत. त्यावर वीरमरण पत्करलेल्या सैनिकांची नावे कोरलेली आहेत.

**४. सबरीमाला मंदिर (केरळ)**

केरळ राज्यातील पठाणमथीमट्टा जिल्ह्यातील सबरीमाला एक धार्मिक पर्यटन स्थळ आहे. सबरीमाला केरळमधील पेरियार वाघ अभयारण्य मध्ये स्थित एक प्रसिद्ध हिंदू मंदिर आहे. जगातील सर्वात मोठी वार्षिक तीर्थक्षेत्र असून येथे दरवर्षी सुमारे 2 कोटी भाविक येतात. शबरीमाला मंदिर समुद्रसपाटीपासून सुमारे 1000 मीटर उंचीवर आहे, जे पश्चिम घाटांपासून सह्यापर्वत च्या दाट जंगलांमध्ये आहे.

सबरीमाला हा शैव आणि वैष्णव यांच्यातील एक अद्भुत दुवा आहे. मल्याळममध्ये 'शबरीमाला' म्हणजे डोंगर. खरं तर, हे स्थान सह्याद्रीच्या रांगांनी वेढलेले. पंपा ते सबरीमाला पर्यंत पायी प्रवास करावा लागतो. हा मार्ग पाच किलोमीटर लांबीचा आहे.सबरीमाला मध्ये अयप्पाचे भगवान मंदिर आहे. शबरी पर्वतावर घनदाट जंगले आहेत. या मंदिरात येण्यापूर्वी, भाविकांना 4१ दिवसांचा कठोर उपवास करावा लागतो, ज्याला ४१ दिवसांचा मंडलम म्हणतात.

**५. तिरुपती मंदिर (आंध्र प्रदेश)**

तमाम हिंदूचे श्रद्धास्थान म्हणजे तिरुपती बालाजी होय. भारतातील तीर्थक्षेत्रांमध्ये प्रसिद्ध असे हे तिरुपती क्षेत्र आहे. देशातील सर्वाधिक श्रीमंत देवस्थान म्हणूनही ओळखले जाते. आंध्रप्रदेश राज्याच्या दक्षिण टोकावरील चित्तूर जिल्ह्यात तिरुपती हे शहर. याच शहराच्या जवळ असलेल्या डोंगरावर बालाजीचे हे मंदिर आहे. याच डोंगराला ‘तिरुमला’ असे म्हणतात. तिरुमला डोंगर रांगेत एकूण 7 डोंगर आहेत.

त्याला सात फण्यांचा आदिशेष असे म्हणतात. हे देवस्थान अगदी शेवटच्या डोंगरावर वसले आहे. म्हणून या परिसराला सप्तगिरी असेही म्हणतात. संपूर्ण डोंगर हा लाल दगडाचा आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे 853 मीटर उंचीवर असलेल्या या ठिकाणी उन्हाळ्यातही थंडावा असतो. भगवान वेंकटेशाचे मंदिर असलेल्या पर्वताला ‘वेंकटाचल’ असेही म्हटले जाते. या डोंगरावर ‘कपिलितीर्थ’ नावाचे सरोवर आहे.

‘तिरु’ म्हणजे ‘लक्ष्मी’ लक्ष्मीचा पती म्हणजे ‘तिरु पती’ (विष्णू). बालाजी हा विष्णूचा अवतार मानला जातो. तिरुपती राजधानी हैदराबादपासून 740 किलोमीटरवर आहे. वैकुंठ एकादशीला येथे लाखो भाविक दर्शनासाठी येतात. असे मानले जाते कि या दिवशी बालाजीचे दर्शन घेतल्यास सर्व पापातून मुक्ती होऊन त्याला मुक्ती मिळते. दररोज सुमारे ५० हजारांहून भाविक या ठिकाणी दर्शनास येत असतात. ओक्टोंबर महिन्यात या ठिकाणी ब्राह्मोत्सव साजरा केला जातो. सुमारे ९ दिवस हा उत्सव असतो.

**६. हरिद्वार (उत्तराखंड)**

हे एक उत्तराखंड राज्यातील हरिद्वार जिल्ह्यातील एक धार्मिक पर्यटन स्थळ आहे. हरिद्वार शहर उत्तराखंडच्या दक्षिण भागात गंगा नदीच्या काठावर वसले आहे व ते राजधानी डेहराडूनच्या ५० किमी नैऋत्येस स्थित आहे. हरिद्वार हे हिंदू धर्मामधील सर्वात पवित्र स्थानांपैकी एक मानले जाते. गंगा नदीचा हरिद्वार येथे भारतीय उपखंडामध्ये प्रवेश होतो. कुंभमेळा भरणाऱ्या ४ स्थानांपैकी हरिद्वार एक असून येथे दर १२ वर्षांनी हा मेळा भरतो. (नाशिक, अलाहाबाद व उज्जैन ही कुंभमेळ्याची इतर तीन स्थाने). तसेच अयोध्या, मथुरा, वाराणसी, कांचीपुरम, उज्जैन व द्वारका समवेत हरिद्वार सप्त पुरी ह्या सात पवित्र तीर्थक्षेत्रांपैकी एक मानले जाते.

**७. केदारनाथ (उत्तराखंड)**

उत्तराखंड राज्यातील रुद्रप्रयाग जिल्ह्यातील केदारनाथ हे एक धार्मिक पर्यटन स्थळ आहे. केदारनाथ मंदिर हे भगवान शंकराचे एक हिंदू मंदिर आहे. हे मंदिर केदारनाथ गावात मंदाकिनी नदीच्या काठावर बांधले गेले आहे. केदारनाथ हिंदू धर्मातील सर्वात पवित्र स्थानांपैकी एक असून ते १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक तसेच पंचकेदार व छोटा धाम ह्या तीर्थक्षेत्रांपैकी एक मानले जाते. हिमालय पर्वतामध्ये स्थित असलेल्या केदारनाथ मंदिराची निर्मिती पांडवांनी केली तर आद्य शंकराचार्यांनी ह्या मंदिराचे पुनरुज्जीवन केले असे मानण्यात येते. केदारनाथ सर्व ज्योतिर्लिंगांपैकी सर्वाधिक उंचीवर स्थित असून येथे भेट देण्यासाठी केवळ पायवाट अस्तित्वात आहे. गौरीकुंडहून १४ किलोमीटर लांबीचा खडतर प्रवास करूनच केदारनाथ मंदिराचे दर्शन घेता येते.

हे मंदिर अक्षय तृतीया ते कार्तिक पौर्णिमा ह्या कालावधीमध्येच खुले असते व हिवाळ्यामध्ये येथील देवांच्या मुर्ती उखीमठ ह्या स्थानवर आणल्या जातात व तेथेच पुजल्या जातात.

**८. बद्रीनाथ मंदिर (उत्तराखंड)**

उत्तराखंड राज्यातील चमोली जिल्ह्यातील अलकनंदा नदी काठावर बद्रीनाथ हे एक प्रसिद्ध हिंदू धर्माचे धार्मिक पर्यटन स्थळ आहे. ऋषिकेश च्या उत्तरेस २१४ किलोमीटर अंतरावर आहे. शहरातील मुख्य आकर्षण म्हणजे बद्रीनाथ मंदिर. प्राचीन शैलीत बांधलेले भगवान विष्णूचे हे मंदिर खूप मोठे आहे. त्याची उंची सुमारे 15 मीटर आहे. पौराणिक कथेनुसार भगवान शंकरांनी शालिग्रामच्या दगडाच्या खाली अलकनंदा नदीतील काळ्या पाषाणावर बद्रिनारायणाची प्रतिमा शोधली.

**९. सारनाथ (उत्तर प्रदेश)**

उत्तर प्रदेश राज्यातील वाराणसी जिल्ह्यातील सारनाथ हे एक धार्मिक पर्यटन स्थळ आहे. सारनाथ हे बौद्ध तीर्थक्षेत्र आहे जे काशी किंवा वाराणसीच्या ईशान्य दिशेला 10 किमी अंतरावर आहे. ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर भगवान बुद्धांनी येथे आपला पहिला उपदेश दिला, ज्याला "धर्म चक्र प्राधान" म्हणतात आणि बौद्ध धर्माच्या प्रसाराची सुरूवात होती. हे स्थान बौद्ध धर्माच्या चार प्रमुख तीर्थक्षेत्रांपैकी एक आहे (इतर तीन म्हणजेः लुंबिनी, बोधगया आणि कुशीनगर). यासह जैन आणि हिंदू धर्मातही सारनाथचे महत्त्व आहे. जैन ग्रंथांमध्ये याला 'सिंहपूर' म्हणतात आणि असे मानले जाते की जैन धर्माचा अकरावा तीर्थंकर, श्रेयनसनाथ इथून थोड्या अंतरावर जन्मला होता. येथे सारंगनाथ महादेवाचे मंदिर आहे जेथे श्रावण महिन्यात हिंदू मेळा भरतो.

**१०. काशी विश्वनाथ मंदिर, वाराणसी (उत्तर प्रदेश)**

उत्तर प्रदेश राज्यातील वाराणसी जिल्ह्यातील काशी विश्वनाथाचे मंदिर हे वाराणसी येथील एक धार्मिक पर्यटन स्थळ आहे. काशी विश्वनाथ मंदिर बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. वाराणसीमध्ये हे मंदिर अनेक हजारो वर्षांपासून आहे. हिंदू धर्मात काशी विश्वनाथ मंदिराला विशेष स्थान आहे. असे मानले जाते की या मंदिरात जाऊन पवित्र गंगा स्नान करून एखाद्याला तारण मिळते. आदि शंकरा, संत एकनाथ रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, महर्षि दयानंद, गोस्वामी तुलसीदास हे सर्व या मंदिरात दर्शनासाठी आले होते

**११. मथुरा (उत्तर प्रदेश)**

उत्तर प्रदेश राज्यातील मथुरा जिल्ह्यातील मथुरा हे एक धार्मिक पर्यटन स्थळ आहे. मथुरा हे शहर ऐतिहासिकदृष्ट्या कनिष्क राजवंशांनी स्थापन केलेले शहर आहे आणि आज ते धार्मिक पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. मथुरा हे भारतीय संस्कृती आणि सभ्यतेचे केंद्र राहिले आहे. भारतीय धर्म, तत्वज्ञान आणि साहित्य निर्मिती आणि विकासात मथुरा यांचे नेहमीच महत्त्वाचे योगदान आहे. आजही या शहराचे नाव महाकवी सूरदास, संगीताचे आचार्य स्वामी हरिदास, स्वामी दयानंद यांचे गुरु स्वामी विरजानंद, कवि रसखान इत्यादी महान जीवांशी संबंधित आहे. मथुराला श्रीकृष्ण जन्म भूमि म्हणूनही ओळखले जाते.

**१२. आयोध्या (उत्तर प्रदेश)**

उत्तर प्रदेश राज्यातील फैजाबाद जिल्ह्यातील अयोध्या हे एक हिंदू चे धार्मिक पर्यटन स्थळ आहे

**१३. बुद्धगया (बिहार)**

महाबोधी विहार हे बिहार राज्यातील बोधगया (बुद्ध गया) मधील एक महा बौद्ध विहार आहे. यास जागतिक वारसा स्थान म्हणून मान्यता मिळालेली आहे. शाक्य वंशाचे राजकुमार सिद्धार्थ गौतमांना या ठिकाणी पूर्णज्ञान (संबोधी/बुद्धत्व) प्राप्ती होऊन ते सम्यक संबुद्ध' बनले, व 'बुद्ध' म्हणून सर्वत्र ओळखले जाऊ लागले. बोधगया ही बिहार राज्यातल्या पाटना शहरापासून ९६ कि.मी. अंतरावर आहे. महाबोधी विहाराच्या पुढे, पश्चिम दिशेला पवित्र असा बोधीवृक्ष आहे. पाली भाषेत या ठिकाणाला 'बोधीमांद' असे म्हणतात आणि तीथे असलेल्या मठाला 'बोधीमांद–विहार' असे म्हणतात. इथल्या सर्वात उंच गोपुराची उंची ५५ मीटर म्हणजे १८० फूट आहे.

**१४. शिर्डी (महाराष्ट्र)**

महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील शिर्डी हे एक धार्मिक पर्यटन स्थळ आहे. या ठिकाणी श्री साईबाबा मंदिर भारतातील दुसरे श्रीमंत धार्मिक पर्यटन स्थळ आहे. इ.स.च्या १९च्या शतकाच्या उत्तरार्धात संत साईबाबांच्या वास्तव्यामुळे शिर्डी नावारूपास येऊ लागले. साईबाबांच्या पश्चात तेथे भक्तांनी उभारलेल्या साईबाबा मंदिरामुळे धार्मिक क्षेत्र म्हणून हे प्रसिद्धी पावले आहे.शिर्डीला साईनगर देखील म्हणतात.

**१५. विठ्ठल मंदिर,पंढरपुर (महाराष्ट्र)**

महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यातील विठ्ठल मंदिर, पंढरपूर हे एक हिंदू धर्मयाचे धार्मिक पर्यटन स्थळ आहे. चंद्रभागा नदीच्या काठावर वसलेले हे धार्मिक पर्यटन स्थळ सर्व वारकरी संप्रदायाचे आकर्षण आहे. येथे आषाढी व कार्तिकी ला लाखो भाविक दर्शनासाठी येतात. त्याचबरोबर महिन्याच्या व तीन महिन्याच्या एकादशीला सुद्धा या ठिकाणी भाविकांची गर्दी असते.

**१६. गोकर्ण (कर्नाटक)**

कर्नाटक राज्यातील उत्तरा कन्नड जिल्ह्यातील कुमठा तालुक्यातील गोकर्ण हे एक धार्मिक पर्यटन स्थळ आहे. गोकर्ण म्हणजे गायीचा कान. दोन नद्यांच्या मिलनातून कानासारखा आकार निर्माण झालेल्या ठिकाणी वसलेले गोकर्ण महाबळेश्वर हे हिंदू धर्मियांचे पवित्र स्थळ म्हणून जसे प्रसिद्ध आहे तसेच येथल्या सुंदर सम्रुद्रकिनाऱ्यांसाठी पर्यटकांचेही आवडते स्थळ आहे. एका बाजूला पश्चिम घाटाचा डोंगरी भाग व दुसऱ्या बाजूला अरबी समुद्र यातून जाणारी गोकर्णची वाट पर्यटकांना अक्षरशः भुरळ घालते.

**१७. श्रवणबेळगोळ (कर्नाटक)**

कर्नाटक राज्यातील हसन जिल्ह्यातील श्रवणबेळगोळ हे एक हे जैन धर्मीयांचे एक तीर्थक्षेत्र आहे. येथील बाहुबली गोमटेश्वराच्या मूर्तीसाठी हे प्रसिद्ध आहे. श्रवणबेळगोळजवळील विंध्यगिरी पर्वतावर बाहुबली गोम्मटेश्वराची ५७ फूट उंचीची मूर्ती अखंड पाषाणातून कोरली आहे. बाहुबली गोम्मटेश्वर जैनांचे पहिले तीर्थंकर ऋषभदेव, अर्थात आदिनाथ यांचा दुसरा पुत्र होता. गंग राजघराण्यातील चावुंडराया या मंत्र्याने इ.स. ९७८ ते इ.स. ९९३ या कालखंडात ही मूर्ती घडवून घेतली. ही मूर्ती अखंड पाषाणातून कोरलेल्या मूर्तींपैकी जगातील सर्वात उंच मूर्ती आहे असे मानले जाते. हे स्थळ युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून घोषित केले आहे. या मूर्तीचे अंदाजे वजन ४०० ते ६०० टन आहे.बाहुबली गोम्मटेश्वराच्या मूर्तीच्या पायथ्याशी मराठी, कन्नड भाषांतील शिलालेख आहेत. मूर्तीच्या चोहो बाजूंनी २४ जैन तीर्थंकरांची छोटी मंदिरे आहेत. मूर्तीपर्यंत पोहोचण्यासाठी विंध्यगिरी पर्वतावर ६५० पायऱ्या खोदल्या आहेत. दर १२ वर्षांनी मूर्तीची महामस्तकाभिषेक पूजा करण्यात येते. लाखो जैन भाविक या उत्सवात सामील होण्यासाठी येतात. मूर्तीवर दूध, दही, तूप, हळद यांचा अभिषेक केला जातो.

**१८. मीनाक्षी मंदिर, मदुराई (तामिळनाडू)**

तामिळनाडू राज्यातील मदुराई जिल्ह्यातील मीनाक्षी मंदिर हे एक धार्मिक पर्यटन स्थळ आहे. तमिळनाड़ूच्या मध्यावर मदुराई वसले आहे. या मदुराईतच प्रसिद्ध मीनाक्षी मंदिर आहे. हिरवीगार शेती, उंच डोलणारी नारळाची झाडं नि त्याच्याशी स्पर्धा करत आकाशाकडे हात फैलावत गेलेली गोपूरे. मदुराईची ही ठळक वैशिष्ट्ये म्हणता येतील. शहराच्या बरोबर मध्ये मीनाक्षी मंदिर वसले आहे. मीनाक्षी मंदिराच्या जवळच सुवर्ण पुष्करणी नावाचे सरोवर आहे. त्याच्या बाजूला सुंदर हिरवाई आहे. फेब्रुवारी महिन्यात मीनाक्षी व सुंदरेश्वर यांच्या मूर्तीला येथे आणून या सरोवरात स्नान घातले जाते.

**१९. महाकालेश्वर मंदिर, उज्जैन (मध्य प्रदेश)**

मध्य प्रदेश राज्यातील उज्जैन जिल्ह्यातील महाकालेश्वर मंदिर हे एक धार्मिक पर्यटन स्थळ आहे. महाकालेश्वर मंदिर भारताच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. या मंदिराचे एक मनोरंजक वर्णन पुराण, महाभारत आणि कालिदास सारख्या महाकवींच्या लेखनात आढळते. स्वयंघोषित, भव्य आणि दक्षिणमुखी असल्याने महाकालेश्वर महादेव पुण्यवान आहेत. असा विश्वास आहे की मोक्ष केवळ त्याच्या तत्त्वज्ञानाने प्राप्त होतो. महाकवी कालिदास यांनी मेघदूत मधील उज्जयनीचा उल्लेख करताना या मंदिराची स्तुती केली आहे

**२०. सूर्य मंदिर, कोणार्क (ओरिसा)**

ओरिसा राज्यातील पुरी जिल्ह्यातील कोणार्क सूर्य मंदिर हे एक धार्मिक पर्यटन स्थळ आहे. येथील सूर्य मंदिर खूप प्रसिद्ध आहे. या मंदिराची कल्पना सूर्याचा रथ आहे. रथात बारा जोड्या, प्रचंड चाके असून सात शक्तिशाली घोड्यांनी वेगाने खेचले आहे. कल्पनाशक्ती जितकी सुंदर आहे तितकीच रचनाही भव्य आहे. आर्किटेक्चर आणि शिल्पकलेच्या विशालता, बांधकाम, सौंदर्य आणि समन्वयासाठी हे मंदिर वैशिष्ट्यपूर्ण आहे आणि ओरिसाच्या स्थापत्य आणि शिल्पकलेच्या अत्युत्तम बाबी दाखवते. हे मंदिर १३ व्या शतकात ओरिसाचा राजा नरसिंहदेव यांनी बनवले होते. असे म्हटले जाते की, भगवान श्रीकृष्णाचा अर्धांगवायू मुलगा, सरमा बारा वर्षे पक्षाघात झाला होता. या कारणास्तव, त्याने हे मंदिर सूर्य देवाला समर्पित केले.

**२१. जगन्नाथ मंदिर, पुरी (ओरिसा)**

ओरिसा राज्यातील पुरी जिल्ह्यातील जगन्नाथ मंदिर हे एक धार्मिक पर्यटन स्थळ आहे. पुरीचे श्री जगन्नाथ मंदिर एक हिंदू मंदिर आहे, जे भगवान जगन्नाथ (श्री कृष्ण) यांना समर्पित आहे. जगन्नाथ या

शब्दाचा अर्थ जगाचा भगवान आहे. त्यांचे शहर जगन्नाथपुरी किंवा पुरी असे म्हणतात.हे मंदिर हिंदूंच्या चार धामांपैकी एक म्हणून गणले जाते. हे वैष्णव संप्रदायाचे मंदिर आहे, जे भगवान श्रीकृष्णाला समर्पित आहे, भगवान विष्णूचा अवतार. या मंदिराचा वार्षिक रथयात्रा उत्सव प्रसिद्ध आहे. यामध्ये मंदिराचे तीन मुख्य देवता, भगवान जगन्नाथ, त्याचा मोठा भाऊ बलभद्र आणि भागिणी सुभद्रा या तीन वेगवेगळ्या भव्य आणि सुशोभित रथांनी शहराला भेट देतात.

## २.3 भारतातील सांस्कृतिक पर्यटन केंद्रे (Cultural tourism centres in India)

इतर घटकाप्रमाणे सांस्कृतिक घटकाला ही पर्यटनाच्या विकासामध्ये महत्त्व आहे. सांस्कृतिक घटकांमध्ये शिल्प, कला, स्थापत्य कला, संगीत, नृत्य, नाटक, चित्रकला, साहित्य, उत्सव इत्यादी घटक येतात. भारतामध्ये वरील घटकाच्या अनुषंगाने अनेक पर्यटन स्थळे आहेत त्यातील काही महत्त्वाची पर्यटन स्थळे पुढीलप्रमाणे

१.आग्रा (उत्तर प्रदेश)

२.लखनऊ (उत्तर प्रदेश)

३.श्रीनगर (जम्मू आणि काश्मीर )

४.लेह लडाख

५.चंदिगड

६.अमृतसर, जालियनवालाबाग (पंजाब)

७.नालंदा (बिहार)

८.शांतिनिकेतन (पश्चिम बंगाल)

९.कोलकत्ता (पश्चिम बंगाल)

१०. खजुराहो (मध्य प्रदेश)

११. मोइरांग, नेताजी स्मारक (मणिपूर)

१२. कोहिमा, हुतात्म्यांची स्मारके (नागालँड)

१३.सांची (मध्य प्रदेश)

१४.पुणे (महाराष्ट्र)

१५.म्हैसूर (कर्नाटक)

१६.बेंगलोर (कर्नाटक)

१७.चेन्नई (तामिळनाडू)

१८.कन्याकुमारी (तामिळनाडू )

१९.वरंगळ (आंध्र प्रदेश)

२०.हम्पी (कर्नाटक)

२१.अजिंठा वेरूळ लेणी, औरंगाबाद (महाराष्ट्र)

**१.आग्रा (उत्तर प्रदेश)**

आग्रा येथील जगप्रसिद्ध ताजमहाल हे अमर प्रेमाचे प्रतीक मानले जाते. मुस्लिम वस्तू रचनेचा उत्कृष्ट नमुना असलेल्या या पर्यटन स्थळे दरवर्षी संपूर्ण जगभरातून लाखो पर्यटक भेटी देतात. इ.स. १६३२ ते १६५० च्या काळात शहाजहान बादशहाने आपली राणी मुमताज बेगम यांच्या स्मरणार्थ यमुना नदी काठी ताजमहाल बांधला. आग्रा शहराच्या दक्षिण बाजूस संपूर्ण संगमरवराने बांधलेली ही वास्तू जागतिक वास्तू रचनेचा एक उत्कृष्ट नमुना असून जगातील एक आश्चर्य मानले जाते. थोडक्यात जगप्रसिद्ध ताजमहाल हे कलेचे सर्वात मोठे कार्य आहे आणि मानवी इतिहासात त्याला जोड नाही.

**२.लखनऊ (उत्तर प्रदेश)**

ही उत्तर प्रदेशची राजधानी लक्ष्मणाने हे गाव वसलेले आहे त्याचे प्राचीन काळी नाव लक्ष्मण पुरी असे होते. या शहराची सांस्कृतिक बाजू भक्कम आहे. येथे हुतात्मा स्मारके, मुस्लिम काळातील वाडे, विद्यापीठ, प्राणीसंग्रहालय, वनस्पती उद्यान, संशोधन केंद्र इत्यादी प्रेक्षणीय स्थळे आहेत. लखनऊ हे कथ्थक नृत्याची जनक नगरी समजली जाते. लखनऊ हे हिंदू-मुस्लीम संस्कृतीचे मिश्रण असलेले एक महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र आहे

**३.श्रीनगर (जम्मू आणि काश्मीर** )

श्रीनगर हे भारताचे नंदनवन असलेले जम्मू-काश्मीरच्या राजधानीचे ठिकाण आहे. हे एक महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र आहे. येथे देशी-विदेशी हजारो पर्यटक भेटी देतात. या शहराला बगीच्याचे

शहर म्हणूनही ओळखले जाते. या शहरांमध्ये दाल सरोवर, नगिन सरोवर आहे. हिंदू मुस्लिमांची अनेक धार्मिक स्थळे सुद्धा श्रीनगर या ठिकाणी आहेत.

**४.लेह, लडाख (केंद्रशासित प्रदेश)**

लेह, लडाख हे भारतातील केंद्रशासित प्रदेशातील ठिकाण आहे. येथे अनेक प्रेक्षणीय बौद्ध गुंफा आहेत, या गुंफाच्या आतील साचा अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आणि मनवेधक आहे. या गुंफत भिंतीवर बुद्धाचे जीवन रंगीत चित्रात चित्रबद्ध केलेले आहे. शिवाय येथील चांदीवरील, तांब्यावरील नक्षीकामाची कलात्मक भाडी, कापडावरील आकर्षक विणकाम, कापडावरील चित्रकारी पर्यटकांचे लक्ष वेधून घेतात. लेहमध्ये एक सांस्कृतिक उत्सव होतो तो पाहण्यासाठी देशी-विदेशी पर्यटक येतात.

**५.चंदिगड**

चंदीगड ही पंजाब व हरियाणा या दोन राज्यांची संयुक्त राजधानी व स्वतंत्र भारतात बांधले गेलेले पहिले पूर्वनियोजित शहर आहे. चंदिगड हे भारतातील पहिले नियोजनबद्ध शहर आहे आणि ते वास्तुशास्त्र आणि नियोजन बद्धाते साठी संपूर्ण जागात ओळखले जाते. रॉक गार्डन आणि प्रसन्न सुखना लेक चंदीगड मधील भेट देण्यासारखी ठिकाणे आहेत. येथील सचिवालय, हायकोर्ट, विद्यापीठ इत्यादी इमारती तसेच झाकीर हुसेन रोज गार्डन, म्युझियम ,रॉक गार्डन, अतिशय प्रेक्षणीय आहेत. फुटक्या बांगड्या, घागरी, काँक्रीट दगड-गोटे इत्यादी टाकाऊ वस्तु पासून तयार केलेली आकर्षक चित्रकर्ती ने भरलेली ही रॉक गार्डन अतिशय सुंदर आहे येथील काही शिल्पे जिवंत वाटणारी आहेत हे एक अतिशय महत्त्वाचे सांस्कृतिक पर्यटन केंद्र आहे.

**६.अमृतसर, जालियनवालाबाग (पंजाब)**

हे एक धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक ठिकाण आहे. सुवर्ण मंदिराजवळ जालियनवाला बाग येथे 13 एप्रिल 1919 मध्ये जनरल डायरने सभेसाठी आलेल्या २००० भारतीयांचा गोळीबार करून बळी घेतला. त्या बागेभोवती भिंतीची तटबंदी असून बागेत प्राणर्पण करणाऱ्या हुतात्म्यांचे स्मारक उभारले आहे. जालियनवाला बाग येथे अनेक लोक त्यांना आदरांजली वाहण्यासाठी भेट देत असतात.

**७.नालंदा (बिहार)**

पाटण्यापासून 90 किलोमीटर अंतरावर नालंदा हे एक सांस्कृतिक केंद्र आहे. येथे पाचव्या शतकात स्थापन झालेले आंतरराष्ट्रीय ख्यातीचे विद्यापीठ आहे. येथे २००० प्राध्यापक असून सुमारे १०००० विद्यार्थी शिक्षण घेतात. येथे सर्व प्रकारच्या पुस्तकाचे एक भव्य ग्रंथालय आहे. या विद्यापीठात विविध

विषयावरील संशोधन कार्य चालते. देशी-विदेशी विद्यार्थी येथे शिक्षण घेण्यासाठी येतात या विद्यापीठाचे बांधकाम पाचव्या, सहाव्या, सातव्या शतकात झाले. या इमारतीचे शिल्प प्राचीन शिल्पाचा एक उत्कृष्ट नमुना आहे.

**८.शांतिनिकेतन (पश्चिम बंगाल)**

कोलकत्ता पासून २१० किलोमीटर अंतरावर रवींद्रनाथ टागोर यांनी स्थापन केलेले विश्व भारती विद्यापीठ या ठिकाणी आहे. हे मुक्त विद्यापीठ असून येथे नैसर्गिक वातावरणात शिक्षण दिले जाते. देशाच्या सर्व भागातील विद्यार्थी येथे शिक्षण घेण्यासाठी येतात.

**९.कोलकत्ता (पश्चिम बंगाल)**

कोलकत्ता हे हुगळी नदीच्या काठावर वसलेले पश्चिम बंगालच्या राजधानीचे ठिकाण आहे. हे भारताच्या पूर्वेकडील एक मोठे शहर सांस्कृतिक ठिकाण आणि भारताच्या पूर्वेकडील महाद्वार आहे. शहराच्या मध्यभागी स्वतंत्र लढ्यातील "विनय बादल दिनेश" ही बाग आहे. येथे विधानसभा, हायकोर्ट, सेंट जॉर्ज चर्च आहे. चौरंगी हा कोलकत्यातील एक मुख्य भाग आहे येथे सुभाषचंद्र बोस, चित्तरंजन दास, लोकमान्य टिळक यांचे भव्य पुतळे आणि ५० मीटर उंचीचा एक शहीद मिनार आहे. कोलकत्ता येथील इंडियन म्युझियम प्रसिद्ध आहे येथे नाना तऱ्हेच्या दुर्मिळ वस्तू ठेवल्या आहेत यात पुराणवस्तू, मानवशास्त्र ,भूगर्भशास्त्र ,प्राणिशास्त्र, औद्योगिक इत्यादी संबंधीच्या वस्तू प्रमुख आहेत.

**१०. खजुराहो (मध्य प्रदेश)**

खजुराहो हे मध्य प्रदेश प्रांतातील एक प्रमुख शहर आहे, जे प्राचीन आणि मध्ययुगीन मंदिरांसाठी प्रसिद्ध आहे. हे मध्य प्रदेशातील छतरपूर जिल्ह्यात आहे. खजुराहो हे प्राचीन काळी 'खजुरपुरा' आणि 'खजूर वाहिका' म्हणूनही ओळखले जात असे. येथे मोठ्या संख्येने प्राचीन हिंदू आणि जैन मंदिरे आहेत. खजुराहो मंदिरांचे शहर दुमडलेल्या दगडांनी बांधलेल्या मंदिरांसाठी जगभर प्रसिद्ध आहे. खजुराहो हे सुशोभित मंदिरे म्हणून ओळखले जातात जे देशातील सर्वोत्तम मध्ययुगीन स्मारके आहेत. याशिवाय प्रेमाच्या या अतुलनीय सौंदर्याचे प्रतीक म्हणून भारताव्यतिरिक्त जगभरातून अभ्यागत आणि पर्यटक सातत्याने येतात. मध्यकालीन काळात या शहराच्या दगडांवर हिंदू कला आणि संस्कृतीचे कारागीर कोरले गेले होते. या मंदिरांमध्ये विविध कामक्रिदास सुंदर सजावट केल्या गेल्या. या शिल्पांमध्ये देवी-देवता, अप्सरा, नर्तिका, गायिका, ग्रहणी, माता यांची रेखीव व

वास्तव शिल्पे आहेत. दरवर्षी मार्च महिन्यामध्ये येथे दहा दिवसाचा खजुरहो नृत्य महोत्सव भरतो. येथील जैन धर्मियांचे पार्श्वनाथ मंदिर हे शिल्पकले बद्दल प्रसिद्ध आहे.

**११. मोइरांग, नेताजी स्मारक (मणिपूर)**

मणिपूरमध्ये पहिल्यांदा आठवण येते ती दुस-या महायुद्धात नेताजी सुभाषचंद्र बोसांनी इतिहास घडविलेल्या मोइरांगची. इंफाळपासून ४५ की.मी. वरील लोकटाक लेकच्या पश्चिम किना-यावरील मोइरांग हे खास मणिपुरी संस्कृतीसाठी ख्यातनाम गावं. नेताजींच्या आझाद हिंद सेनेनं १४ एप्रिल १९४४ रोजी भारताचा तिरंगा ज्या जागी प्रथम फडकवला तेथे स्मारक म्हणून नेताजींचा पुतळा, नेताजी लायब्ररी, वॉर म्युझियम आणि इंडियन नॅशनल आर्मीनं सिंगापुरमध्ये उभारलेल्या संगमरवरी स्मारकाची प्रतिकृती उभारलेली आहे.

**१२.कोहिमा, हुतात्म्यांची स्मारके (नागालँड)**

इंफाळप्रमाणे 1944 मध्ये जपानची भारतातील आगेकूच थांबवण्यासाठी ब्रिटिश सेनेतील जे १२०० जवान धारातीर्थी पडले त्यांचे मृत्यू येथे दफन करण्यात आले. प्रत्येक धड्ग्यावर जवानांची नावे कोरली आहेत. प्रत्येक धड्ग्यामध्ये फुलांचे झाड आहे तसेच भारतीय सैनिकांना येथे एकत्रित अग्नी दिली त्या जागी एक संगमरवरी भिंत बांधली आहे. त्यावर सैनिकांची नावे आहेत. कोहिमा येथे एक स्टेट म्यूझियम आहे या म्युझियममध्ये नागा आदिवासी जमातीच्या विविध वस्तू, पोशाख, दागिने, वाद्य, हत्यारे त्यांच्या घराचे नमुने वैशिष्ट्यपूर्ण रित्या मांडलेले आहेत. त्याशिवाय ईशान्य भारतात आढळणाऱ्या पशुपक्ष्यांचे नमुने ठेवण्यात आलेले आहेत.

**१३.सांची (मध्य प्रदेश)**

हे भोपाळ पासून 45 किलोमीटर अंतरावरील बौद्ध धर्माचे स्थान आहे. येथे बौद्धकालीन अवशेष आढळतात. सांची येथील स्तूप पाहण्यासारखे आहेत. दि ग्रेट हा येथील प्रमुख स्तूप आहे. याची उंची 16 मीटर व्यास 37 मीटर आहे. या स्तुपाचे काम सम्राट अशोकाच्या काळात तिसऱ्या शतकात झाले. या स्तूपाच्या कमानीचे कोरीव काम अप्रतिम आहे. याच्या कमानीवर पशुपक्षी, वृक्ष इत्यादीच्या आकृत्या कोरलेल्या आहेत हे एक महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र आहे.

**१४.पुणे (महाराष्ट्र)**

महाराष्ट्रातील सांस्कृतिक व शैक्षणिक राजधानी समजले जाणारे पुणे शहर देशातील झपाट्याने वाढत जाणाऱ्या शहरांपैकी एक आहे. या शहराला ऐतिहासिक, सांस्कृतिक व औद्योगिक वारसा लाभलेला आहे. महाराष्ट्रातील महत्त्वाचे औद्योगिक केंद्र म्हणून मुंबईनंतर पुण्याचा क्रमांक लागतो. पुण्यात राजा केळकर वस्तुसंग्रहालय हे अप्रतिम प्रेक्षणीय संग्रहालय आहे. पुण्याच्या आसपास अनेक ऐतिहासिक, धार्मिक वास्तू आहेत. पुण्याचा शनिवारवाडा राजकीय सत्तेचे प्रतीक मानले जाते. आगाखान पॅलेस, कस्तुरबा समाधी ही दोन्ही ठिकाणी पुण्याचे महत्त्व वाढविणारी व पर्यटकांना स्फूर्ती देणारी आहेत. पुण्यातील सारसबाग ही पर्यटकांना आकर्षित करणारी आहे. येथे प्रसिद्ध पेशवेकालीन गणेश मंदिर आहे. पुणे हे पर्यटकांच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण पर्यटनाचे सांस्कृतिक ठिकाण मानले जाते.

**१५.म्हैसूर (कर्नाटक)**

म्हैसूर हे बेंगलोर पासून 140 किलोमीटर अंतरावर असून हे कर्नाटकातील एक प्रमुख सांस्कृतिक केंद्र आहे. म्हैसूर मध्ये अनेक वैभवशाली राजवाडे आहेत त्यामुळेच म्हैसूरला राजवाड्यांचे शहर म्हणतात. या राजवाड्याचे शिल्प अतिशय अप्रतिम आहे. येथील लक्ष्मी विलास पॅलेस, जगमोहन पॅलेस, ललित महाल खूपच प्रेक्षणीय आहेत. या राजवाड्यातील लाकडावरील नक्षीकाम, भिंतीवरील चित्रे, राजवाड्यातील सोने, चांदी, हस्तिदंत याचे काम हा कलेचा अजोड नमुना आहे. येथील उद्यान ही प्रसिद्ध आहेत म्हैसूर पासून 28 किलोमीटर अंतरावर कृष्णराज सागर धरणाजवळ जगप्रसिद्ध वृन्दावन गार्डन आहे. येथील हिरवळीचा, फुलांची झाडे, कारंजे, रात्री पाण्यात टाकण्यात येणारा प्रकाश, यामुळे बागेची स्वरूप विलोभनीय असते. म्हैसूर येथे प्राणी संग्रहालय आहे. म्हैसूर येथे चंदनाच्या लाकडापासून विविध कलाकुसरीच्या वस्तू तयार केल्या जातात येथील रेशीम उद्योग इ महत्त्वाचा आहे. येथे दसऱ्याचा सण मोठ्या उत्साहाने व भक्तिभावाने साजरा होतो. प्रभू रामाच्या विजयाच्या स्मरणार्थ हा उत्सव साजरा केला जातो. यावेळी देशी-विदेशी पर्यटक एकत्र येतात. म्हैसूर हे भारतातील एक प्रमुख पर्यटन क्षेत्र आहे.

**१६.बेंगलोर (कर्नाटक)**

बेंगलोर हे कर्नाटकाच्या राजधानीचे ठिकाण व महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र आहे. बेंगलोरची भारतातील सुंदर शहरात गणना होते. नियोजनबद्ध पद्धतीने वसलेले हे शहर आहे. बेंगलोरला उद्यानांचे शहर म्हणतात. या शहरातील लालबाग हे पर्यटकांचे मोठे आकर्षण आहे. या बागेतील देशी-विदेशी विविध प्रकारचे

वृक्ष वेली, रंगीबेरंगी फुले, हिरवळ आकर्षक कारंजे यामुळेही लालबाग अतिशय प्रेक्षणीय आहे. यामागे मध्ये तीन हजार दशलक्ष वर्षापूर्वीचा प्रचंड खडक आहे. बेंगलोर मध्ये अधून मधून भव्य राजवाडे दिसून येतात, त्यामध्ये टिपू सुलतान चा राजवाडा प्रसिद्ध आहे, याशिवाय येथील विधानसभेचे टोलेजंग इमारत, बेंगलोर मधील विश्वेश्वरय औद्योगिक व तंत्रज्ञान संग्रहालय आणि शासकीय आर्ट गॅलरी पाहण्यासारखे आहे. याशिवाय येथील लहान मुलांची क्रीडा व करमणूक केंद्र म्हणून कबूल पार्क व जवळच असणारे बन्नेरगट्टा राष्ट्रीय उद्यान पर्यटकांचे आकर्षण आहेत. बेंगलोर येथे रेशीम व कलाकुसरीच्या वस्तू तयार होतात.

**१७.चेन्नई (तामिळनाडू)**

भारताच्या पूर्व किनाऱ्यावर वसलेले चेन्नई हे बंदर असून त्या वेळच्या राजधानीचे ठिकाण व तामिळ संस्कृतीचे मुख्य केंद्र आहे. संस्कृतीच्या दृष्टीने येथील परंपरागत नृत्यकला यांचे प्रशिक्षण देणारी कलाक्षेत्र ही संस्था विशेष असून हे दक्षिणात्य चित्रपट निर्मितीचे प्रमुख केंद्र आहे. चेन्नई येथे ईस्ट इंडिया कंपनीने १६५३ मध्ये बांधलेला किल्ला सेंट जॉर्जे चर्च आणि सेंट मेरी चर्च आहेत. चेन्नईतील कपालेश्वर मंदिर, शिवमंदिर, विष्णू मंदिर ही प्रसिद्ध मंदिरे आहेत, ही दोन्ही मंदिरे द्रविडीयन शिल्पाचा नमुना आहे. येथील गव्हर्मेंट म्युझियम हे पुराण वस्तूचे एक संग्रहालय असून, आर्ट गॅलरी हे चित्रकला विविध नमुने असलेले केंद्र आहे. येथे ख्यातनाम तामिळ कवी किरु कोट्टम यांचे भव्य स्मारक आहे. चेन्नईतील गिडी भागात एक सर्पोद्यान आहे. येथे विविध जातीचे साप आहेत तसेच चेन्नई जवळ महाबलीपुरम येथे एक पक्षी संग्रहालय आहे त्यामध्ये नानातऱ्हेचे पक्षी आहेत. चेन्नई जवळ लहान-मोठे बीचेस आहेस येथील मरिना हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा बीच आहे.

**१७.कन्याकुमारी (तामिळनाडू )**

भारताच्या दक्षिण टोकाजवळ कन्याकुमारी आहे. येथे समुद्र किनाऱ्यापासून काही अंतरावर समुद्रातील एका खडकावर विश्वबंधुत्व व शांततेचा संदेश देणाऱ्या स्वामी विवेकानंद यांचे भव्य स्मारक आहे.बोटीतून स्मारका पर्यंत जाता येते. नैसर्गिक वातावरणात बाधलेले हे स्मारक अतिशय शांत आणि प्रसन्न आहे. येथे स्वामी विवेकानंदाचा साडेसात फूट उंचीचा पुतळा आहे. या पुतळ्यासमोर एक मंडप आहे. कन्याकुमारी येथे कन्याकुमारी चे मंदिर आहे. तसेच महात्मा गांधी यांच्या अस्थी विसर्जना पूर्वी येथे ठेवल्या होत्या त्या ठिकाणी महात्मा गांधींचे स्मारक आहे. कन्याकुमारी येथून सूर्योदय-सूर्यास्त चे दृश्य सुंदर दिसते येथे दरवर्षी भारताच्या सर्व भागातून हजारो पर्यटक येतात.

**१९.वरंगळ (आंध्र प्रदेश)**

आंध्र प्रदेशातील तेलंगणा प्रांतांचा समावेश असलेला एकेकाळचा काकती या राजकारणाच्या राजधानीचे हे ठिकाण आहे. वरंगळ हे केवळ आंध्रप्रदेशातील नव्हे तर भारतातील एक महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र आहे. येथे काळ्या बेसल्ट खडकातून कोरलेल्या अनेक सुंदर मूर्ती आहेत. जवळच असणारे नागार्जुनकोंडा हे बेट येथील दगडातून कोरलेल्या सुंदर मूर्ति साठी प्रसिद्ध आहे. कृष्णा नदीवर बांधलेल्या नागार्जुन सागर या जलाशयाचे हे बेट आहे.

**२०.हम्पी (कर्नाटक)**

विजयनगर साम्राज्याच्या मध्ययुगीन हिंदू राज्याची राजधानी हंपी होती. तुंगभद्रा नदीच्या काठी वसलेले हे शहर आता हम्पी म्हणून ओळखले जाते आणि आता ते फक्त अवशेषांच्या रूपात शिल्लक आहे. हे शहर युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समाविष्ट झाले आहे. दरवर्षी हजारो पर्यटक आणि यात्रेकरू येतात. येथे पाचशेहून अधिक स्मारके आहेत. यामध्ये मंदिरे, वाडे, तळघर, पाण्याचे अवशेष, जुने बाजार, शाही मंडप, प्लॅटफॉर्म, तिजोरी अशा असंख्य इमारतींचा समावेश आहे. हंपी येथील विठ्ठाल मंदिर परिसर सर्वात भव्य स्मारकांपैकी एक आहे. त्याच्या मुख्य हॉलमधील 56 खांब टॅप केल्यावर त्यांच्यामधून वाद्य लहरी निघतात. हॉलच्या पूर्वेस प्रसिद्ध रॉक-रथ आहे जो प्रत्यक्षात दगडांच्या चाकांनी चालविला होता. हम्पीत अशी अनेक आश्चर्ये आहेत. राणीसाठी बांधलेल्या बाथमध्ये कमानदार कॉरिडॉर, हवेशीर बाल्कनी आणि कमळाच्या आकाराचे कारंजे सुसज्ज होते. या व्यतिरिक्त कमल महल आणि जानखानाही अशा प्रकारच्या आश्चर्यांमध्ये समाविष्ट आहेत.येथे हत्ती खाण्याचे प्रवेशद्वार आणि घुमटाकार कमानी असून शहरातील शाही प्रवेशद्वारावरील राम मंदिर शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे.

**२१.अजिंठा वेरूळ लेणी, औरंगाबाद (महाराष्ट्र)**

महाराष्ट्रातील लेण्या म्हटलं की पहिलं डोळ्यांसमोर नाव येतं ते म्हणजे औरंगाबाद जिल्हयातल्या अजिंठा, वेरूळ येथील लेण्या. या लेण्या म्हणजे पर्यटकांचं खास आकर्षण आणि अभ्यासकांना संशोधनात गुंतवून ठेवणारं वैभवच म्हणता येतील. यातल्या काही लेण्या बौद्ध, हिंदू आणि काही जैन आहेत.

**अजिंठा**

औरंगाबाद शहरापासून ९९ किमी अंतरावर असलेल्या अजिंठा येथील लेण्या स्थापत्यकला, शिल्पकला आणि चित्रकलेसाठी जगप्रसिद्ध आहेत. या ठिकाणी एकूण २९ लेण्या आहेत. या सर्व लेण्या वाघूर नदीच्या आसपास विखुरलेल्या असून नदीच्या पात्रापासून १५-३० मीटर उंचीवर कातळात आहेत. ही लेणी वाकाटक चालुक्य आणि राष्ट्रकूट या कालखंडात निर्माण केली गेली, असं म्हटलं जातं.पुरातत्त्व शास्त्रीय पुराव्यानुसार ही लेणी दोन वेगवेगळ्या कालखंडात निर्माण केली गेली. त्यातील नऊ, दहा, बारा, तेरा आणि पंधरा या लेण्या हीनयान कालखंडात कोरल्या गेल्या असाव्यात. हा कालखंड साधारणत: इ. स. पूर्वीच्या दुस-या शतकाच्या सुमारास सुरू झाला. या सगळ्या लेण्यांमध्ये स्तूप असून त्या स्तूप रूपांमधून बुद्धांचे दर्शन होते. नऊ आणि दहा क्रमांकाची लेणी चैत्यगृह आहे. तर बारा, तेरा आणि पंधरा-अ ही लेणी विहार आहेत.वर सांगितलेल्या क्रमांकाच्या लेण्या सोडून १ ते २९ क्रमांकांची लेणी साधारणत: ८००-९०० वर्षानंतर म्हणजे इ.स.च्या सहाव्या आणि सातव्या शतकाच्या आसपास म्हणजे महायान कालखंडात निर्माण केली आहे. या लेण्यांमधून गौतम बुद्धांचे सर्वसामान्य लोकांना परिचित असलेलं रूप दिसून येतं.महायान लेणी वाकाटक राजांच्या राजवटीत निर्मिली गेली. त्यामुळे या लेण्यांना ‘वाकाटक लेणी’ असंही संबोधलं जातं. या महायान कालखंडातील लेण्यांपैकी १९, २६ आणि २९ क्रमांकाची लेणी चैत्यगृहं असून १,२,३,५,६,७,८,११,१४,१५,१६,१७,१८,२०,२१,२२,२३,२४,२५,२७ आणि २८ क्रमांकाची लेण्या विहार आहेत.हे विहार साधारणपणे चौरस आकाराचे असून त्यांची लांबी-रुंदी ५२ पूट आहे. विहार मुख्यत्वे भिक्षूंना राहण्यासाठी होतं तर चैत्यगृह हे पारंपरिकरीत्या पूजाअर्चेसाठी वापरलं जात होतं. ब-याच विहारांना सोपा आणि आंगण करण्यात आलं असून तिथे दगडांत कलाकुसर आणि चित्रं काढण्यात आली आहेत.

**वेरूळ**

औरंगाबाद शहरापासून ३० किलोमीटर अंतरावर वेरूळ हे एक छोटं खेडंगाव आहे. तिथे सहयाद्रीच्या रांगांमधील सातमाळ म्हणून ओळखल्या जाणा-या पर्वतरांगेत दोन किलोमीटर परिसरात या वेरूळ लेण्यांचा समूह विखुरलेला आहे. इ.स. १९८३ साली वेरूळ लेणी ‘युनेस्को जागतिक वारसा स्थळ’ म्हणून घोषित केली गेली. या साधारणत: पाचव्या ते दहाव्या शतकाच्या कालखंडात कोरण्यात आल्या आहेत.प्राचीन काळात कोरलेल्या १२ बौद्ध, १७ हिंदू आणि ५ जैन अशा एकूण ३४ लेण्या आहेत. त्यामुळे बौद्ध, हिंदू आणि जैन असे या लेण्यांचे तीन भाग पडले आहेत. पैकी बौद्ध लेणी सगळयात जुनी लेणी आहे. ही मुख्यत्वे विहार रूपाची आहेत. क्रमांक एक लेणीमध्ये बौद्ध भिक्षूंना राहण्यासाठी एकूण आठ खोल्या खोदल्या ओहत. या लेणीचं वैशिष्ट्य म्हणजे या

लेणीमध्ये खांब नाही.खांबाशिवाय खोदलेली ही गुंफा इथली सर्वात जुनी गुंफा आहे. यात गाभारा नाही तसंच कुठल्याही प्रकारची मूर्ती किंवा प्रतिमा नाही. क्रमांक दोनच्या लेणीत बौद्ध भिक्षूंना राहण्याबरोबरच गौतम बुद्धांची पूजा, मनन आणि चिंतन करता यावं या उद्देशाने या लेणीत भिंतीतला गाभारा आहे. या गाभा-यात बुद्धप्रतिमा असून पाय उमललेल्या कमलासनावर टेकलेले आहेत.आसन चौकोनाकृती असून त्यावर सिंहप्रतिमा कोरलेल्या आहेत. क्रमांक १०ची लेणी प्रसिद्ध असून तिला ‘विश्वकर्मा लेणी’ असंही म्हणतात. यात एक चैत्यगृह आहे. चैत्यगृहाला वरचा मजला असून त्यावर सज्जा कोरलेला आहे. त्या सज्जाच्या कठडयावर अनेक लहान शिल्पाकृती आहेत.चैत्यगृहाच्या मुख्य कमानीवर तीन अर्धवलयं आहेत. त्यांना ‘त्रिदली’ किंवा ‘बिल्वतोरण’ असं म्हणतात. स्थापत्यकलेच्या दृष्टीने ही लेणी सरस म्हटली जाते. समोर मोठं प्रांगण आहे. प्रांगणाच्या सभोवताली असलेल्या दगडी भिंतीमध्ये लेण्यांचं प्रवेशद्वार कोरलेलं आहे. प्रवेशद्वाराच्या बाजूला एका कोनाडयाच्या भिंतीवर दोन ओळींमध्ये ब्राम्ही लिपितील शिलालेख आहे.क्रमांक ११ लेणी ही दोन ‘ताल लेणी’ म्हणून ओळखली जाते. ही लेणी प्रत्यक्षात तीन मजली आहे. वर जाण्यासाठी पाय-या आहेत. पहिल्या मजल्यावर गर्भगृह असून मध्यभागी भगवान बुद्धाची योगमुद्रेत बसलेली प्रतिमा आहे. दुस-या मजल्यावर चार गर्भगृह आहेत तर तिस-या मजल्यावर प्रशस्त विहार आहे. बारा क्रमांकाची लेणी ‘राजविहार लेणी’ म्हणून प्रसिद्ध आहे. तिलाच ‘तीन ताल’ असंही म्हणतात. ही लेणी तीन मजली आहे. पहिल्या मजल्यावर अनेक स्तंभ आहेत.लेणीच्या मागच्या बाजूला गर्भगृह असून त्यात सिंहासनावर बसलेली बुद्धप्रतिमा आहे. वरूळमधील हिंदू लेणी म्हणजे शिल्पकारांनी कातळात कोरलेली अतिप्रचंड शिल्प आहे. या लेण्यामधली सोळावी लेणी म्हणजे मोठं शिवमंदिर असून जगातील सर्वात मोठं कोरीव शिल्प आहे.या मंदिराची रचना कैलास पर्वताच्या धर्तीवर आधारित आहे. तर तिस-या विभागातली जैन लेणी ही इतर लेण्यांच्या तुलनेत लहान आहेत. जैन धर्माची वैराग्यभावना दर्शवतात. अतिशय बारीक कोरीवकाम आणि विविध शिल्प ही या जैन लेण्यांची वैशिष्ट्ये आहेत.

## २.४ भारतातील ऐतिहासिक पर्यटन स्थळे (Historical tourism centers in India)

पर्यटन विकासामध्ये ऐतिहासिक घटकांनाही महत्व आहे. ऐतिहासिक घटकांमध्ये राजधान्या, किल्ले, युद्ध स्थाने, ऐतिहासिक स्थाने यांचा समावेश होतो. पर्यटकांना प्राचीन इतिहास जाणून घेण्याची एक जिज्ञासा असते त्यातूनच ऐतिहासिक पर्यटनस्थळाचा विकास भारतामध्ये झालेला आहे. भारतामध्ये अनेक ऐतिहासिक पर्यटन स्थळे आहेत त्यातील काही महत्त्वाची ऐतिहासिक पर्यटन स्थळे पुढीलप्रमाणे

१. हवा महाल, जयपूर (राजस्थान)

२. चारमिनार, हैदराबाद

३. सांची स्तूप (मध्यप्रदेश)

४. फतेहपूर सिक्री, आग्रा

५. म्हैसूर पॅलेस

६. लाल किल्ला, दिल्ली

७.पुराना किल्ला, दिल्ली

८.आमेर महल, जयपूर (राजस्थान)

९.जलमहल (राजस्थान)

१०.जैसलमेर किल्ला (राजस्थान)

११.आग्रा किल्ला, उत्तर प्रदेश

१२.ताजमहाल, उत्तर प्रदेश

१३.ग्वाल्हेर किल्ला, मध्य प्रदेश

१४.चित्तोडगढ किल्ला, राजस्थान

१५.मेहरानगढ किल्ला, जोधपुर (राजस्थान)

१६.गोवळकोंडा किल्ला, हैदराबाद (आंध्र प्रदेश)

१७.टिपू सुलतान समाधि, श्रीरंगपट्टणम (कर्नाटक)

१८.गोल गुम्मट, विजापुर (कर्नाटक)

१९. इंडिया गेट (दिल्ली)

२०. गेटवे ऑफ इंडिया, मुंबई

२१.हम्पी (कर्नाटक)

२२.अमृतसर, जालियनवालाबाग (पंजाब)

२३. पानिपत, हरियाणा

२४.कुरुक्षेत्र, हरियाणा

२५. प्लासी, पश्चिम बंगाल

२६. लक्ष्मीविलास पॅलेस, वडोदरा (गुजरात)

२७. घारापुरीची लेणी किंवा एलिफंटा लेणी, मुंबई

२८. कुतुब मिनार, दिल्ली

**१. हवा महाल, जयपूर (राजस्थान)**

गुलाबी शहर म्हणून ओळख असलेल्या जयपूरमधील हवामहाल हे राजस्थानचे प्रतिक असून जगभरात राजस्थानची ओळख याच वास्तूमुळे होते. या महालामध्ये 365 खिडक्या आणि तावदाने आहेत. याची निर्मिती 1799 मध्ये जयपूरचे महाराजा सवाई प्रताप सिंह यांनी केली होती. राजस्थानी आणि पारसी स्थापत्य शैलीच्या मिळत्या जुळत्या रुपात बनवण्यात आलेली ही इमारत जयपूरच्या बडीचौपड चौकातून चांदी टकसाल जाणाऱ्या रस्त्यावर आहे. हवामहलाचे 'आनंदपोल' आणि 'चांदपोल' नावाचे दोन प्रवेशव्दार आहेत. आनंदपोलवर बनवण्यात आलेली गणपतीच्या मुर्तीमुळे या द्वाराला 'गणेशपोल' सुध्दा म्हटले जाते. गुलाबी शहराचे हे गुलाबी गौरव आपल्या आकर्षक आणि आश्चर्यकारक बांधकामामुळे आज जगभरात प्रसिध्द आहे.

**२. चारमिनार, हैदराबाद**

हैदराबाद शहराची ओळख असलेला चारमिनार मुस्लिम वास्तूशैलीचे एक उत्तम उदाहरण आहे. 1591 मध्ये शहराची प्लेगच्या आजारापून सुटका झाल्याच्या आनंदात चारमिनार बांधण्यात आले होते. जगभरात हैदराबादची ओळख असलेले चारमिनारचे स्वरूप त्याच्या नावावरूनच कळून येते. चार मिनाराने बनलेल्या या वास्तूच्या सानिध्यात प्रत्येक संध्याकाळ अविस्मरणीय होऊन जाते. हैदराबाद रेल्वे स्टेशनपासून सात किलोमिटर अंतरावर चारमिनार आहे. तर बसस्थानकापासून हे ठिकाण पाच किलोमिटर अंतरावर आहे. खासगी वाहनानेही चारमिनारला अगदी सहजपणे पोहोचता येते.

**३. सांची स्तूप (मध्यप्रदेश)**

मध्यप्रदेशची राजधानी भोपाळ आणि विदीशा यांच्या दरम्यान वसलेले सांची स्तूप जगभरातील पर्यटकांचे आकर्षण आहे. इसवीसनाच्या पहिले, तिसर्या शतकात सम्राट अशोक यांनी हे स्तूप बनवले होते. हे स्तूप शांती, आस्था, शैर्य आणि प्रेमाचे प्रतिक मानले जाते. सम्राट अशोक यांनी हे स्तूप बौध्द धर्माच्या शिकवणीला जनसामान्यपर्यंत पोहोचवता यावे यासाठी बनवले होते. अनेक वर्षांपर्यंत कोणालाच माहिती नसलेला सांची स्तूप आज जगभारत प्रसिध्द आहे, तसेच याच्या ऐतिहासिक महत्त्वामुळे युनेस्कोने याला जागतिक पर्यटनस्थळाचा (वर्ल्ड हेरिटेज) दर्जा दिला आहे.

**४. फतेहपूर सिक्री, आग्रा**

आग्रा जिल्ह्यातील लहानसे फतेहपूर सिक्री आजही आपल्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारस्याला जपून आहे. मुघल बादशाह अखबरने हे ठिकाण बनवले होते. या वास्तूत मुघल वास्तूशैली, संस्कृती आणि कलेची झलक पहायला मिळते. एका दशकापेक्षा जास्त काळ फतेहपूर सिक्री हे मुघलांची राजधानी होते. येथील सर्वात उंच असलेला बुलंद दरवाजा जगप्रसिध्द आहे. याची उंची 280 फुट आहे. बादशहा अकबरने हा दरवाजा 1602 मध्ये गुजरात विजयानंतर बांधला होता. या शिवाय येथील जामा मशिद, शेख सलीम चिश्ती यांची समाधी, दिवान-ए-आम, पंचमहाल, बीरबल महाल इत्यादी प्रमुख ठिकाणे याच शहरात आहेत.

**५. म्हैसूर पॅलेस**

म्हैसूर पॅलेस महाराजा पॅलेस, राजमहाल म्हैसुरच्या कृष्णराज वडीयार चौथे यांचे आहे. यापूर्वीचे राजमहाल चंदनाच्या लाकडांनी बनवण्यात आले होते. एका दुर्घटनेत या राजमहालाचा बराचसा भाग जळून गेला होता. त्यानंतर दुसरे महाल बनवण्यात आले. म्हैसूर पॅलेस म्हणजे द्रविड, पूर्वी आणि रोमन वास्तूशैलीचे अद्भूत संगम मानले जाते. नफासतने घासलेले सलेटी दगडांनी बनवलेल्या या महलाचे घुमट गुलाबी रंगच्या दगडांनी बनलेले आहेत. या महालात एक मोठा किल्ला आहे ज्याचा घुमट सोन्याच्या दगडांनी बनवण्यात आला आहे. त्यामुळे हे घुमट सूर्याच्या प्रकाशात खुपच चमकते. दुसर्या महलांप्रमाणे येथेही राजांसाठी दिवान-ए-खास आणि सामान्य लोकांसाठी दिवान-ए-आम आहे. येथे अनेक कक्ष आहेत ज्यामध्ये चित्र आणि राजाचे हत्यार ठेवण्यात आले आहेत. राजाची वस्त्रे, आभूषणे, महोगनीच्या लाकडावरील कोरीव नक्षीकाम असलेले मोठमोठे दरवाजे आणि छताला लावण्यात आलेले झाड-फानूस यामुळे या महलाचे सौंदर्य अधिकच वाढते. हे महाल सकाळी 10

ते संध्याकाळी 4.30 वाजेपर्यंत पर्यटकांसाठी खुले असते. संध्याकाळी रोषणाई केल्यावर म्हैसूर पॅलेसची शोभा अधिकच वाढते. या महालाचे आता म्यूझियमध्ये रुपांतर करण्यात आले आहे.

**६. लाल किल्ला, दिल्ली**

लाल किल्ल्याचा पाया शहाजहानच्या काळात बनवण्यात आला. या किल्ल्याला पूर्ण होण्यास 9 वर्षांचा अवधी लागला. मुस्लिम वास्तूशैलिप्रमाणे हा किल्लाही अष्टकोनी आहे. तर उत्तरेस हा किल्ला सलीमगड किल्ल्याला जोडला गेला आहे. लाहोरी गेटशिवाय हाथीपोल या किल्ल्याचा दुसरा प्रवेशव्दार आहे. याबद्दल असे मानण्यात येते की, येथे राजा आणि त्यांचे पाहूणे हे हत्तीवरून उतरत. लाल किल्ल्याचे मुख्य आकर्षण म्हणजे मुमताज महाल, रंग महाल, खास महाल, दिवान-ए-आम, दिवान-ए-खास, हमाम आणि शाह बुर्ज हे आहेत. हा किल्ला जगभरात भारताची शान म्हणून ओळखला जातो. तसेच याच किल्ल्यावर स्वातंत्र्य दिनादिवशी भारताचे पंतप्रधान ध्वजारोहण करतात व भाषण देतात. 1562-1572 दरम्यान बनवलेला हा किल्ला दिल्लीत येणार्या पर्यटकांचे विशेष आकर्षण आहे. या इमारतीवर पारसी वास्तुकला तज्ज्ञ मिरक मिर्झा गियायुथ यांची छाप स्पष्टपणे दिसून येते. हा किल्ला यमुना नदीच्या किनार्यावर असलेल्या संत निजामुद्दीन औलिया यांच्या दरग्याजवळ आहे. या किल्ल्यालासुध्दा युनेस्कोने जागतिक पर्यटनस्थळाच्या यादीत स्थान दिले आहे.

**७.पुराना किल्ला, दिल्ली**

या किल्ल्याची निर्मिती सूरवंशाचे संस्थापक शेरशाह सूरी यांनी 16 व्या शतकात केले होते. 1539-40 मध्ये शेरशाह सूरीने मुघल बादशाह हूमायुनला हरवून दिल्ली आणि आग्र्यावर कब्जा केला होता. 1545 मध्ये त्यांच्या मृत्यूनंतर हुमायूनने पुन्हा दिल्ली आणि आग्रा काबीज केला. शेरशाह सूरीने बनवलेल्या लाल दगडांच्या इमारतीला शेर मंडळात हूमायुनने आपले पुस्तकालय बनवले. हा किल्ला केवळ देशी-परदेशी पर्यटकांनाच नाही तर इतिहासकारांच्याही आकर्षणाचे केंद्रबिंदू आहे. नुकतेच भारतीय पुरातत्व विभागाच्या एका अहवालात म्हटले आहे की, ज्या ठिकाणी पुराना किल्ला बनलेला आहे, त्याच ठिकाणी पुर्वी इंद्रप्रस्थ वसलेले होते. इंद्रप्रस्थाला भारतीय पुराणांमध्ये महाभारतातील शहर मानले जाते. या किल्ल्यात प्रवेशासाठी तीन दरवाजे आहेत. यामध्ये एक हुमायुन दरवाजा, तलकी दरवाजा आणि बडा दरवाजा अशी यांची नावे आहेत. सध्या हे एक बोट क्लब असून येथे नौकाविहाराचा आनंद घेता येऊ शकतो. या किल्ल्याच्या जवळच प्राणी संग्रहालयसुध्दा आहे.

**८.आमेर महल, जयपूर (राजस्थान)**

जयपूरच्या प्रमुख ऐतिहासिक स्थळांमध्ये या महालाचा समावेश होते. अरवलीच्या मध्यम उंचीवर असलेल्या या आमेर महलाचे निर्मिती सोळाव्या शतकात झाली होती. या महालाला पाहताच तत्कालिन मुघल आणि राजपूत वास्तूकलेचा अंदाज यायला लागतो. या भव्य महलाची तुलना जगातील सर्वात चांगल्या महालांशी केली जाते. आमेर महालात एक मोठे जेलेब चौक, शिलामाता मंदिर, दिवान-ए-आम, गणेश पोल, शीश महाल, सुख मंदिर, मुघल गार्डन, राणींचे महाल इत्यादी वास्तू पाहण्यासारख्या आहेत. शीश महालामधील काचेचे नक्षीकाम सर्वांनाच भूरळ घालते त्यामुळेच येथे मुघल-ए-आझमपासून ते जोधा अकबर यांसारख्या डझनभर चित्रपटांचे चित्रिकरण करण्यात आले आहे. नुकतेच आमेर महालवरून जयगडला जाणार्या मार्गावरील एका बोगद्याला पर्यटकांसाठी खुले करण्यात आले. जयगड किल्ल्यावर ठेवण्यात आलेली जयबाण तोफ आशियातील सर्वात मोठ्या तोफांपैकी एक आहे.

**९.जलमहल (राजस्थान)**

जलमहाल पाण्यावर तरंगणारे सुंदर अशा जहाजे प्रमाणे दिसणारी एक ऐतिहासिक वास्तू आहे. जयपूर शहरापासून उत्तरेला जवळपास 8 किमी आमेर रोडवर जलमहल आहे. मानसागर तलावाच्या मध्यभागी असणारे हे महाल खुपच सुंदर दिसते. आमेरमध्ये पाण्याची कमतरता भासायला लागली तेव्हा या महालाची निर्मिती करण्यात आली. जयपूरचे महाराजा येथे सुट्टीच्या काळात विश्रांतीसाठी येत. सध्या हे पर्यटनाचे प्रमुख स्थळ आहे.

**१०.जैसलमेर किल्ला (राजस्थान)**

राजस्थानमधये थारच्या मरूभीच्या हृदय स्थळावर चस्पा जैसलमेर एक वाळवंटी ठिकाण आहे. येथे अनेकांची सुंदर स्वप्न खरी ठरतात. हे ठिकाण मरूभूचीच्या सोनेरी मरीचिकाप्रमाणेच आहे, येथे एकदा येणारा पर्यटक वारंवार येथे यायला लागतो. जैसलमेरच्या दर्शनिय स्थळांमध्ये येथील सर्वात जुना किल्ला सर्वात महत्त्वाचा आहे. हा किल्ला शहरामध्येच जवळपास 100 मीटरच्या उंचीवर आहे. येथे असलेल्या समाधींच्या छतांवर बारीक नक्षीकाम करण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर, येथे अनेक सम्राटांच्या नक्षीदार घोडस्वार करतानाच्या मुर्त्यासुध्दा आहेत. दरवर्षी जानेवारी-फेब्रूवारीमध्ये वाळवंट उत्सव साजरा केला जातो. यामध्ये उंटांची शर्यत, लोकसंगीत आणि नृत्य, कटपुतळी शोचे आयोजन करण्यात येते.

**११.आग्रा किल्ला, उत्तर प्रदेश**

हा भुईकोट किल्ला भारताच्या आग्रा शहरात आहे. यास जागतिक वारसा स्थळ म्हणूनही घोषित करण्यात आले आहे. जगप्रसिद्ध ताजमहाल येथून अडीच किमी अंतरावर आहे या किल्ल्याला काही इतिहासकार चार भिंतीनी घेरलेली प्रासाद महाल नगरी म्हणतात .भारताचे मुगल सम्राट बाबर, हुमायुं, अकबर, जहांगीर, शाहजहां आणि औरंगज़ेब येथे राहत होते, तसेच येथूनच पूर्ण भारतावर शासन करत होते. येथे राज्यातील सर्वाधिक खजाना, सम्पत्ति आणि टकसाल होती. येथे विदेशी राजदूत, यात्री आणि उच्च पदस्थ लोकांचे येणे जाणे जाने चालू असायचे ज्यांनी भारताचा इतिहास रचला.

**१२.ताजमहाल, उत्तर प्रदेश**

ताजमहाल हे भारतातील आग्रा नगरात यमुनानदीकाठी असलेले एक स्मारक असून हे जगातील सात आश्चर्यांपैकी एक गणले जाते. ताजमहाल हा मोगल स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. त्याची आर्किटेक्चरल शैली पर्शियन, ओट्टोमन, भारतीय आणि इस्लामिक आर्किटेक्चरच्या घटकांची एक अनोखी संमिश्रता आहे. १९८३ मध्ये, ताजमहाल युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ बनले. यासह, हे जागतिक वारसामध्ये प्राप्त झालेल्या सर्वोत्कृष्ट मानवी कार्यांपैकी एक म्हणून वर्णन केले गेले आहे. ताजमहाल हा देखील इस्लामिक आर्ट ऑफ इंडियाचा रत्नजडित घोषित करण्यात आला आहे. त्याचे पांढरे घुमट आणि टाइल संगमरवरीने आकारात झाकलेले आहेत, संरक्षित संगमरवरी ब्लॉक्स्च्या मोठ्या थरांनी बनविलेल्या इमारतींप्रमाणे बनविलेले नाहीत. मध्यभागी बांधलेले समाधी त्याच्या स्थापत्य श्रेष्ठतेमध्ये सौंदर्याचे संयोजन दर्शवते. ताजमहाल इमारत गटाचे वैशिष्ट्य म्हणजे ते पूर्णपणे सममितीय आहे. त्याचे बांधकाम वर्ष १६४८ मध्ये जवळजवळ पूर्ण झाले होते. उस्ताद अहमद लाहोरी हे बऱ्याचदा मुख्य डिझाइनर मानले जातात. मुगल बादशाहशहाजहान याने त्याच्या मुमताज महल या प्रिय पत्नीच्या मृत्युपश्चात तिच्या स्मृती प्रीत्यर्थ हे शुभ्र संगमरवरात स्मारक उभारले. ताज महालाचे बांधकाम इ.स. १६५३ मध्ये पूर्ण झाले. उस्ताद अहमद लाहौरी यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण २०,००० कामगारांनी हे बांधकाम पूर्ण केले. ताज महाल ही वास्तू मुघल स्थापत्यशैलीचे एक उदाहरण आहे. प्रतिवर्षी सुमारे तीस लक्ष (३०,००,०००) पर्यटक ताज महालाला भेट देतात.

**१३.ग्वाल्हेर किल्ला, मध्य प्रदेश**

ग्वाल्हेर दुर्ग हे ग्वाल्हेर शहराचे मुख्य स्मारक आहे. ग्वाल्हेरचा किल्ला बघेल राज्यकर्ता सूरज सेन यांनी बांधला होता. बघेल राज्यकर्त्यांनी ग्वाल्हेरवर सुमारे 1000 वर्षे राज्य केले. हा किल्ला

'गोपाचल' (गोप + अचल = गोप पर्वत) या डोंगरावर वसलेला आहे. किल्ल्याच्या पहिल्या राजाचे नाव सूरज सेन होते, त्याचे नाव प्राचीन 'सूरज कुंड' किल्ल्यावर वसलेले आहे. हे राजा मान सिंह तोमर यांनी 8 व्या शतकात बांधले होते. वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या राज्यकर्त्यांनी यावर नियंत्रण ठेवले. गुजरी महल राणी मृगयनाय साठी बांधला गेला. सध्या हा किल्ला पुरातत्व संग्रहालयाच्या रूपाने आहे. या किल्ल्यात स्थित एका छोट्या मंदिराच्या भिंतीवर शून्य (०) कोरले गेले आहे, हे शून्य लिखाणाचे दुसरे सर्वात प्राचीन उदाहरण आहे. ही शून्य सुमारे 1500 वर्षांपूर्वी कोरली गेली होती.

**१४.चित्तोडगढ किल्ला, राजस्थान**

चित्तोडगढ किल्ला हा राजस्थान राज्यातील एक किल्ला आहे.संत मीराबाईपासून राणि पद्मिनीपर्यंत अनेक महत्वाच्या ऐतिहासिक व्यक्तिंचे स्थान असलेला हा रम्य किल्ला अतिषय प्रेक्षणीय आहे.हा अशियातील आकाराने सर्वात मोठा किल्ला आहे. या किल्याचा परिसर जवळपास ७०० एकर आहे.किल्ल्यामध्ये सुंदर राजवाडे, मंदिर, तलाव, पद्मनी महाल प्रेक्षणीय आहे. या किल्ल्यात १४४० मध्ये उभारलेले विजय स्तंभ व किर्तिस्तंभ ही दोन स्मारके आहेत हा किल्ला पाहण्यासाठी दरवर्षी अनेक पर्यटक येतात.

**१५.मेहरानगढ किल्ला, जोधपुर (राजस्थान)**

मेहरानगढ हा राजस्थान राज्यातील जोधपूरमधील एक किल्ला आहे.१४६०साली जोसवणाऱ्या राव जोधा या राजाने मेहरानगढ किल्ल्याची उभारणी केली. जोधपुर शहरापासून ४१५ मीटर उंचीवरील हा किल्ला मोठ्या भिंतीमुळे अभेद्य बनला आहे. किल्ल्यात अनेक सुंदर महाल आहेत. मोती महाल, शिश महाल, फुल महाल, सिलेह खाना, दौलतखाना असे अनेक महाल बघण्यासारखे आहेत. मेहरानगढ किल्ल्यावर साहसी खेळांची आवड असणाऱ्या पर्यटकांसाठी 'झिप लाईन' ची सोय आहे. सलमान खान च्या 'हम साथ साथ है' चित्रपटाचे चित्रीकरण मेहरानगढ किल्ल्यावर झाले आहे.

**१६.गोवळकोंडा किल्ला, हैदराबाद (आंध्र प्रदेश)**

आंध्र प्रदेशात हैदराबाद पासून 13 किलोमीटर अंतरावर गोवळकोंडा हा ऐतिहासिक किल्ला आहे. गोवळकोंडा हा भारतातला एक प्रसिद्ध किल्ला. गोवळकोंडा म्हणजे मेंढपाळाचा किल्ला. मुळात हा मातीचा किल्ला होता त्यानंतर कुतूबशाही घराण्यानं हा किल्ला पुन्हा मजबूत बांधला. हैदराबादपासून ११ किलोमीटर्सवर हा किल्ला आहे. इथला परिसर सुंदर आहे. जुन्या काळातल्या महालांचे अवशेष, भल्यामोठ्या

तोफा, मोठाले दरवाजे बघण्याजोगे आहेत. गोवळकोंडा किल्ल्याची माहिती लाईट व साऊंड शोच्या माध्यमातून सांगितली जाते.

**१७.टिपू सुलतान समाधि, श्रीरंगपट्टणम (कर्नाटक)**

मैसूर पासून 16 किलोमीटर अंतरावर असलेले हे टिपू सुलतान च्या राजधानीचे ठिकाण आहे येथे टिपू सुलतान चा राजवाडा कबर जामा मशीद इत्यादी प्रेक्षणीय स्थळे आहेत या ऐतिहासिक पर्यटनस्थळांना लाखो पर्यटक भेट देत असतात

**१८.गोल गुम्मट, विजापुर (कर्नाटक)**

हे आदिलशहाच्या राजधानीचे ठिकाण असून कर्नाटकातील एक महत्त्वाचे ऐतिहासिक पर्यटन केंद्र आहे. येथे गोल घुमट, मुलुख मैदान तोफ, जामा मशिद इत्यादी प्रेक्षणीय स्थळे आहेत. गोल घुमट मध्ये एक वेळा बोललेला आवाज सात वेळा ऐकू येतो त्यामुळे येथे अनेक पर्यटक भेटी देतात.

**१९. इंडिया गेट (दिल्ली)**

इंडिया गेट हे भारताचे एक राष्ट्रीय स्मारक आहे. ते दिल्ली येथे असून त्याची रचना एडविन लुटयेन्स यांनी केली होती. इंडिया गेट इ.स. १९३१ साली बांधले गेले. सुरुवातीला ते ऑल इंडिया वॉर मेमोरिअल या नावाने ओळखले जात असे. पहिल्या महायुद्धात ॲग्लो-अफगाण युद्धात मरण पावलेल्या ९०,००० ब्रिटिश इंडियन आर्मीमधील सैनिकांसाठी हे स्मारक बनविले गेले होते. ते लाल आणि फिक्या ग्रॅनाइट दगडांपासून बनविले आहे. भारतीय सैन्यदलातील शहीद सैनिकांच्या स्मरणार्थ अमर जवान ज्योती इंडिया गेट येथे आहे.

**२०. गेटवे ऑफ इंडिया, मुंबई**

गेटवे ऑफ इंडिया ही दक्षिण मुंबईमधील एक कमान आहे. १९११मध्ये पाचवा जॉर्ज आणि राणी मेरी यांनी भारताला दिलेल्या भेटीचे स्मारक म्हणून ही भव्य कमान बांधण्यात आली होती. याची पायाभरणी ३१ मार्च, १९१३ रोजी करण्यात आली व १९२४मध्ये ही इमारत बांधून पूर्ण झाली. बेसाल्ट दगडांनी बांधलेली ही कमान २६ मीटर (८५ फूट) उंचीची आहे. गेटवे ऑफ इंडिया हे शहराचे प्रमुख पर्यटन आकर्षण आहे.

**२१.हम्पी (कर्नाटक)**

विजयनगर साम्राज्याच्या मध्ययुगीन हिंदू राज्याची राजधानी हंपी होती. तुंगभद्रा नदीच्या काठी वसलेले हे शहर आता हम्पी म्हणून ओळखले जाते आणि आता ते फक्त अवशेषांच्या रूपात शिल्लक आहे. हे शहर युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समाविष्ट झाले आहे. दरवर्षी हजारो पर्यटक आणि यात्रेकरू येतात. येथे पाचशेहून अधिक स्मारके आहेत. यामध्ये मंदिरे, वाडे, तळघर, पाण्याचे अवशेष, जुने बाजार, शाही मंडप, प्लॅटफॉर्म, तिजोरी अशा असंख्य इमारतींचा समावेश आहे. हंपी येथील विठ्ठल मंदिर परिसर सर्वात भव्य स्मारकांपैकी एक आहे. त्याच्या मुख्य हॉलमधील 56 खांब टॅप केल्यावर त्यांच्यामधून वाद्य लहरी निघतात. हॉलच्या पूर्वेस प्रसिद्ध रॉक-रथ आहे जो प्रत्यक्षात दगडांच्या चाकांनी चालविला होता. हम्पीत अशी अनेक आश्चर्ये आहेत. राणीसाठी बांधलेल्या बाथमध्ये कमानदार कॉरिडॉर, हवेशीर बाल्कनी आणि कमळाच्या आकाराचे कारंजे सुसज्ज होते. या व्यतिरिक्त कमल महल आणि जानखानाही अशा प्रकारच्या आश्चर्यांमध्ये समाविष्ट आहेत.येथे हत्ती खाण्याचे प्रवेशद्वार आणि घुमटाकार कमानी असून शहरातील शाही प्रवेशद्वारावरील राम मंदिर शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे.

**२२.अमृतसर, जालियनवालाबाग (पंजाब)**

हे एक धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक ठिकाण आहे. सुवर्ण मंदिराजवळ जालियनवाला बाग येथे 13 एप्रिल 1919 मध्ये जनरल डायरने सभेसाठी आलेल्या २००० भारतीयांचा गोळीबार करून बळी घेतला. त्या बागेभोवती भिंतीची तटबंदी असून बागेत प्राणर्पण करणाऱ्या हुतात्म्यांचे स्मारक उभारले आहे. जालियनवाला बाग येथे अनेक लोक त्यांना आदरांजली वाहण्यासाठी भेट देत असतात.

**२३. पानिपत, हरियाणा**

पानिपत हरियाणा राज्यातील एक शहर आहे. हे शहर पानिपत जिल्ह्याचे प्रशासकीय केंद्र आहे.दिल्लीपासून ९० किलोमीटरवर असून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १ वर आहे. हे शहर भारतीय इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. या शहरात तीन युद्धे लढली गेली. या युद्धांमुळे भारतीय इतिहासाला प्रत्येक वेळी वेगळे वळण लागले. हे ठिकाण आता ऐतिहासिक पर्यटन केंद्र बनले आहे

**२४.कुरुक्षेत्र, हरियाणा**

कुरुक्षेत्र हे हरियाणा राज्यातील एक ऐतिहासिक शहर व कुरुक्षेत्र जिल्ह्याचे मुख्यालय आहे. आहे. ह्याला धर्मक्षेत्र असेही संबोधले जाते. कुरुक्षेत्रचे नाव पौराणिक काळामधील कुरू राजावरून पडले आहे. महाभारतामधील कौरव व पांडवांदरम्यान झालेले कुरुक्षेत्र युद्ध येथेच लढले गेले असे मानले जाते. ह्या युद्धादरम्यान आप्तेष्टांसोबत लढण्यास अनुत्सुक असलेल्या अर्जुनाला उपदेश देण्यासाठी भगवान कृष्णांनी भगवद्गीता सांगितली होती. या पर्यटनस्थळी हजारो पर्यटक भेटी देतात.

**२५. प्लासी, पश्चिम बंगाल**

प्लासीची लढाई जून २३, इ.स. १७५७ रोजी झालेली ब्रिटिश ईस्ट ईंडिया कंपनी व बंगालच्या नवाबच्या सैन्यांमधील लढाई होती. ह्या लढाईत फ्रेंचांनी बंगालच्या नवाबाला मदत केली होती. ही लढाई इंग्रजांनी जिंकलेली पहिली प्रमुख लढाई होती व बंगालचा मोठा प्रांत ब्रिटीश अखत्यारीत आला व इंग्रजांचे भारतावर अधिकृत रित्या राज्य चालू झाले जे पुढील १९० ( १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत) वर्षे टिकले. ह्या राज्याची सुरुवात ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनी या नावाने होती. ही लढाई कोलकाता पासून साधारणपणे १५० किमी वर भागीरथी नदीच्या काठी पलाशी गावाच्या नजीक झाली.

**२६. लक्ष्मीविलास पॅलेस, वडोदरा (गुजरात)**

लक्ष्मीविलास पॅलेस हा गुजरातच्या वडोदरा शहरातील एक आलिशान राजवाडा आहे. हा राजवाडा बडोद्याचे महाराज तिसरे सयाजीराव ह्यांनी १८९० साली १.८ लाख पाउंड इतक्या खर्चामध्ये बांधला. तिसरे सयाजीराव यांनी आपल्या कारकिर्दीत बडोद्याचे संस्थान वैभवसंपन्न केले. त्यांनी आकर्षक भव्य इमारती, उद्याने, हिरवळीची मैदाने, कारंजी, रुंद रस्ते तयार करून बडोदा शहर सुशोभित केले. लक्ष्मीविलास'च्या परिसरात असलेल्या मोतीबाग पॅलेस आणि फतेहसिंग म्युझियम या भव्य इमारतींमध्ये शस्त्रागार आणि महान चित्रकार राजा रविवर्मा यांनी चितारलेली तैलचित्रे आहेत.

**२७. घारापुरीची लेणी किंवा एलिफंटा लेणी, मुंबई**

घारापुरीची लेणी किंवा एलिफंटा लेणी ही महाराष्ट्रामधील मुंबईपासून ६-७ मैल अंतरावर समुद्रातील घारापुरी या लहान बेटावर डोंगरात ही लेणी आहेत. ही लेणी भव्य आकाराच्या शिल्पासाठी प्रसिद्ध आहेत. पाषाणात खोदलेली ही लेणी इ.स.चे ९ वे शतक ते १३ वे शतक या कालखंडात निर्माण करण्यात आली होती. १९८७ साली या लेण्यांना युनेस्को जागतिक वारसा स्थानाचा दर्जा दिला गेला.

घारापूरी लेण्यांच्या प्रवेशद्वाराजवळ हत्तीचे प्रचंड आकाराचे एक शिल्प होते, त्यावरूनच या लेण्यांना एलिफंटा लेणी असे नाव पडले. हे शिल्प सध्या मुंबईच्या राणीच्या बागेत आहे. ही लेणी मुंबई शहराच्या पूर्वेस समुद्रात किनाऱ्यापासून १० कि.मी. दूर आहेत.

**२८. कुतुब मिनार, दिल्ली**

कुतुब मिनार ही विटांनी बांधलेली जगातील सर्वात उंच इमारत आहे. हा मिनार भारताच्या दक्षिण दिल्ली शहरातील मेहरोली भागात आहे. हा मिनार पाहायला परदेशातून लोक येत असतात. ही वास्तू युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ घोषित केले आहे. कुतुब मिनार वर सर्व बाजुंनी कुराणातिल वचने आणि अनेक अप्रतिम इस्लामिक शिल्प कोरलेली आहेत.

## संदर्भ ग्रंथ सूची


१. डॉ.शिंदे एस. बी.(२००६): पर्यटन भूगोल, फडके प्रकाशन, कोल्हापूर

२. डॉ. शिंदे सुनिता शंकरराव (२०१३): पर्यटन भूगोल, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद

३. डॉ. घारपुरे विठ्ठल (२००१): पर्यटन भूगोल, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर

४. खतीब के. ए (२००६): पर्यटन भूगोल, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

५. दूरशिक्षण केंद्र (२००९): पर्यटन भूगोल, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

६. प्रा. अ.वि. भागवत (१९९८): पर्यटन भूगोल, अश्वमेध प्रकाशन, पुणे

७. https://hi.wikipedia.org/wiki/